# मैत्री संदेश




लेखक
हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी
अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी

# मैत्री संदेश

लेखक
हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी
अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी

| | |
|---|---|
| पुस्तकाचे नाव: | पैगाम-ए-सुलह |
| लेखक: | हजरत मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी (अ.स) |
| अनुवादक: | डॉ. बशारत अहमद |
| टाईपिंग व सेटिंग: | खान मामून अहमद एतेज़ाज़ |
| प्रकाशन वर्ष: | २०२१ |
| संख्या: | ५०० |
| प्रकाशक: | मुद्रण व प्रकाशन विभाग, कादियान-१४३५१६<br>जिल्हा गुरदासपूर, (पंजाब) |
| मुद्रण : | फजले उमर प्रिंटींग प्रेस, कादियान, भारत. |

| | |
|---|---|
| Name of the book: | Paigam-e-sulah |
| Writer: | Hazrat Mirza Ghulam Ahmad Qadiani,<br>Masih Mauood Alaihissalam |
| Translator: | Dr. Basharat Ahmad |
| Typing & Setting: | Khan Mamoon Ahmed Etyzaz |
| Edition: | 2021 |
| Quantity: | 500 |
| Publisher: | Nazarat Nashr-o-Isha'at,<br>Qadian, 143516 |
| Printed at: | Fazl-e-Umar Printing Press,<br>Qadian, Dist. Gurdaspur, (Punjab)<br>INDIA |



हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी
अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी(अ.स)

## प्रस्ताविक

''पैगाम ए सुलह'', हा हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी, अपेक्षित मसीह व महदी, यांचा जगाला शेवटचा संदेश आहे. मूळ उर्दु ग्रंथाचे हे मराठी भाषांतर आपल्या सेवेत सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. या महान लेखाद्वारे हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी यांनी भारतीय उपखंडातील दोन मोठे राष्ट्र हिन्दू आणि मुसलमान यांच्या मध्ये शांती आणि समेट घडविण्यासाठी मन:पूर्वक आवाहन केले असून त्यासाठी स्वर्णीम अशी कार्यप्रणाली सुचवली आहे. हुजूरनी राष्ट्रांच्या आपसातील तिरस्कार आणि सामाजिक दुराव्याचे मूळ कारण धार्मिक विसंवाद ठरविले आहे. आणि म्हटले आहे की, इस्लामची शिकवण तर अशी आहे की, सर्वच धर्मांतील माननीय साधु आणि संतांचा आदर करावा आणि त्यांच्या धार्मिक तीर्थांचे पावित्र्य कायम ठेवावे. या पुस्तिकेत हुजूरनी इस्लामचे समतावादी आणि एकात्मतावादी शिकवणीचा थोडक्यात उल्लेख केला आहे. हुजूरनी या लेखामध्ये धार्मिक बेबनाव आणि तिरस्कार संपुष्टात आणण्यासाठी जी तत्त्वे सांगितली आहेत, तीच या समस्येचे योग्य समाधान करू शकतात या शिवाय अन्य कुठलेही उपाय निरर्थक ठरतील. या लेखाचे महत्त्व आणि आवश्यकता दृष्टीक्षेपात ठेवून यांच्या अनेक आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. नज़ारत नश्रो ईशाअत क़ादियान, या लेखाची संगणकीय आवृत्ती मराठी भाषेत लोकहितासाठी, मसीहाचे पाचवे ख़लीफा यांची परवानगी घेऊन प्रकाशित करत आहेत. अल्लाहकडे प्रार्थना आहे, की, त्याने या प्रकाशनाला प्रासादिक

बनवावे आणि हा संदेश राष्ट्रांच्या आपसातील तिरस्काराची भावना नष्ट करून त्यांना आपसात प्रेमाने आणि बंधुभावाने तसेच एकात्मताने आणि सहयोगाने एका सशक्त अशा समाजात परावर्तित करावे. सर्व शक्तिमान अल्लाह वाचकांना हा संदेश समजून घेऊन इतरांपर्यंत पोहोचविण्याची सबुद्धी देवो. आमीन.

अध्यक्ष, मुद्रण व प्रकाशन विभाग,
क़ादियान.

## काहीं महत्तवपूर्ण सूचना

या मराठी मजकूरात आलेल्या अरबीशब्दांचे संक्षिप्त अक्षरे दिलेले आहेत, त्यांचे अर्थ व स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहेत; तसेच काहीं इस्लामीक संज्ञांचे अर्थ देखील नमूद आहेत.

**(स.)** - हे अक्षर ''सल्लल्लाहू अलैहिवसल्लम'' याचे संक्षिप्त रूप आहे. याचा अर्थ, अल्लाहची कृपा व शांती त्यांना लाभो, असा होतो. हे प्रार्थनात्मक शब्द विशेषकरून श्रेष्ठतम प्रेषित मुहम्मद (स.) यांचासाठी वापरले जाते.

**(अ.स.)** - ''अलैहिस्सलाम'' प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या व्यतिरिक्त जगात प्रकट झालेल्या सर्व प्रेषितांचे नाव उच्चारल्यावर (अ.स.) म्हणतात. याचा अर्थ, त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो, असा होतो.

**राष्ट्र** - समाज.

**कलमा**- धर्मसूत्र (ला इलाहा इल्लल्लाहु मुहमदुर्रसूलूल्लाह)

'**ला इलाहा इल्लल्लाहु मुहमदुर्रसूलूल्लाह**' - अल्लाह व्यतिरिक्त इतर कोणीही उपासनेस पात्र नाही आणि मुहम्मद हे अल्लाहचे प्रेषीत आहे.

## बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम
## नहमदहू व नुसल्ली अला रसूलिहिल करीम
## व अला अब्दिहिल मसीहिल मौऊद

हे माझ्या सर्व शक्तिमान परमेश्वरा! हे माझ्या प्रीयतम मार्गदर्शका! तु आम्हाला तो मार्ग दाखव ज्याद्वारे तुला सिध्द आणि सदाचारी लोक प्राप्त करतात आणि आम्हाला त्या मार्गापासून सुरक्षित ठेव ज्यांचा उद्देश फक्त व्याभिचार आहे किंवा असुया आहे किंवा घृणा किंवा इहलोकीय स्वार्थ आहे.

हे वाचकांनो आणि श्रोत्यांनो! आम्ही सर्व जण मुसलमान असोत की हिन्दू, आपसातील शेकडो मतभेद असताना देखील त्या परमेश्वरावर श्रध्दा ठेवण्यात सहभागी आहोत, जो या सृष्टीचा निर्मिक आणि स्वामी आहे. तसेच आम्ही सर्वजण, मानव या नावाने सुध्दा एकमेकाच्या बरोबर आहोत अर्थात आम्ही सर्वजण मानव म्हणवले जातो. आणि तसेच एकाच देशाचे नागरिक असल्यामुळे आम्ही एकमेकाचे शेजारी देखील आहोत. म्हणून आमचे कर्तव्य आहे की, विशुध्द अंत:करणाने आणि प्रामाणिकपणे एक दुसऱ्याचे मित्र बनून रहावे आणि धार्मिक आणि भौतिक संकटात एकमेकाशी संवेदनशीलता राखावी आणि ही संवेदनशीलता अशा स्वरूपाची असावी, की आपण एकमेकाचे अवयव बनून जावे.

हे देश वासियांनो! तो धर्म, धर्म असू शकत नाही ज्यामध्ये सार्वत्रीक संवेदनशीलतेची शिकवण नाही. आणि तो मानव, मानव नाही ज्याच्या मध्ये संवेदनशीलतेचे गुण नाही. आमच्या परमेश्वराने कुठल्याही राष्ट्राशी भेदभाव केलेला नाही. उदाहरणार्थ ज्या ज्या मानवी शक्ति आणि सामर्थ्य आर्यावर्तातील आदीम राष्ट्रांना देण्यात आल्या आहेत, तीच सर्व सामर्थ्ये अरब लोकांना आणि पारशीना आणि सिरीयन लोकांना आणि चिनी, जापानी तसेच युरोप आणि अमेरिकेच्या राष्ट्रांना देखील बहाल करण्यात

आली आहेत. सर्वांसाठी परमेश्वराची भूमी अंथरूणाचे काम करते आणि सर्वांसाठी त्याचे सुर्य, चंद्र आणि अनेक नक्षत्र प्रकाशमान दिपकाचे कार्य करत आहेत; तसेच अन्य सेवा देखील करत आहेत. त्याचे निर्माण केलेले मूलतत्त्वे अर्थात हवा, पाणी, अग्नि आणि पृथ्वी आणि त्याचप्रमाणे अन्य सर्वच उत्पन्न केलेल्या वस्तू धान्य आणि फळे आणि औषधे वगैरे पासून सर्वच राष्ट्रे लाभान्वित होत आहेत. म्हणून या ईश्वरीय सद्गुणांपासून आम्हाला असा धडा देण्यात येतो की आम्ही सुध्दा मानव जातीशी दयेने आणि सद्भावनेने वागत जावे आणि संकुचित दृष्टीकोनाचा त्याग करावा.

मित्रांनो! खात्री बाळगून असा, की जर आम्ही दोन्ही राष्ट्रांपैकी एखादे राष्ट्र जर परमेश्वराच्या सद्गुणांचा आदर करणार नसेल आणि त्याच्या पवित्र गुणांच्या विरोधात आपले आचरण ठेवेल, तर ते राष्ट्र लवकरच नष्ट होईल. आणि फक्त स्वत:च नव्हे तर स्वत:च्या भावी संततीला देखील विनाशाकडे घेवून जाईल. कारण जेव्हापासून या पृथ्वीची निर्मीती झाली आहे, सर्वच देशातील सत्यवादी लोक साक्ष देत आले आहेत, की परमेश्वराच्या सद्गुणांचा अनुयायी होणे मानवाच्या अस्तित्वासाठी अमृता समान आहे. आणि मानवाचे शारिरीक आणि आध्यात्मिक जीवन याच एका गोष्टीशी निगडीत आहे, की त्याने परमेश्वराच्या सर्व पवित्र सद्गुणांचे अनुकरण करावे, जो सलामती चा निर्झर आहे.

परमेश्वराने पवित्र कुरआन ची सुरूवातच या वचना पासून केली आहे जो सुरह फातिहा (प्रथम अध्याय) मध्ये आहे.

اَلۡحَمۡدُ لِلّٰہِ رَبِّ الۡعٰلَمِیۡنَ

(अल् फातिहा-२)

अर्थात सर्व परिपूर्ण आणि पवित्र गुणवैशिष्ट्ये ईश्वरासाठी खास आहेत, जो सर्वसृष्टींचा विधाता आहे. सृष्टी या शब्दात सर्व विविध राष्ट्रे सर्व विविध युग, आणि वेगवेगळे देश प्रदेश सामील आहेत. आणि या

वचना पासून पवित्र कुरआनाची सुरूवात झाली आहे. वास्तविक पाहता हे त्या राष्ट्रांच्या संकुचित विचारांचा बिमोड आहे, जे परमेश्वराच्या सार्वत्रिक पालनकर्ता असण्याला आणि प्रसादाला फक्त स्वत:च्या राष्ट्रापूर्ते मर्यादित समजातात आणि इतर राष्ट्रांना असे समजतात जणू ते परमश्ेवराचे दासच नाहीत. आणि जणू परमेश्वराने त्यांना निर्माण करून नंतर रद्दी प्रमाणे फेकून दिले किंवा विसरून गेला आहे. किंवा (ईश्वर क्षमा करो) जणू ते त्याची निर्मितीच नाहीत, जसे, की उदाहरणार्थ यहुदी आणि ख्रिस्ती लोकांचा आजतागायत हाच विचार आहे, की जेवढे म्हणून ईश्वराचे प्रेषीत आणि संदेष्टे आले आहेत ते फक्त यहुदींच्या घराण्यातच आले आहेत आणि परमेश्वर इतर राष्ट्रांवर असा नाराज आहे, की त्यांना मार्गभ्रष्टता आणि गाफिलपणात गुरफटलेले पाहुन देखील त्यांची अजिबात तमा बाळगत नाही. जसे की, इंजील मध्ये लिहिले आहे की, हजरत येशू ख्रिस्त म्हणतात की, मी फक्त इस्त्राईल च्या मेंढरांसाठीच आलेलो आहे. या ठिकाणी आम्ही असे गृहीत धरून म्हणतो की, ईश्वर असण्याचा दावा करून मग असा संकुचित विचार व्यक्त करणे विचित्र गोष्ट आहे. काय येशू ख्रिस्त फक्त इस्त्राईलींचाच ईश्वर होता आणि इतर राष्ट्रांचा ईश्वर नव्हता. म्हणूनच का त्याने असे वचन आपल्या मुखातून व्यक्त केले, की मला इतर राष्ट्रांच्या प्रबोधन आणि सुधारणेशी काहीं देणे घेणे नाही.

थोडक्यात सांगायचे तर यहुदीं आणि ख्रिस्तींचा हाच धर्म आहे, की सर्वच प्रेषीत आणि संदेष्टे त्यांच्या घराण्यातून येत राहिले आहेत आणि त्यांच्याच घराण्यात ईश्वरीय ग्रंथ अवतरीत झाले आहेत आणि मग ख्रिस्ती लोकांच्या श्रध्देनुसार ईशसंदेशाचा आणि ईशवाणीचा तो मार्ग हजरत येशू ख्रिस्ता नंतर संपुष्टात आला आणि ईश्वराच्या वाणी वर प्रतिबंध लागला.

आर्यसमाजी देखील हे विचार बाळगताना दिसून येतात, अर्थात जसे यहूदी आणि ख्रिस्ती प्रेषीतत्व आणि ईशवाणीला इस्त्राईली घराण्यापर्यंतच

मर्यादित ठेवतात आणि इतर सर्व राष्ट्रांना ईशसंदेश प्राप्त करण्यापासून वंचित समजतात; मानवजातीच्या दुर्दैवाने हीच श्रध्दा आर्यसमाजी लोकांनी देखील धारण केली आहे, अर्थात ते देखील अशीच श्रध्दा बाळगतात, की परमेश्वराचे संदेश आणि ईशवाणी फक्त आर्यावर्ताच्या चार भिंतीच्या बाहेर कधी गेलीच नाही. नेहमीच या देशातून चार ऋषी निवडले जातात आणि सदै्व वेद देखील वारंवार अवतरीत होतात आणि सदैव वेदिक संस्कृतीच ईशवाणीसाठी विशेषत्वाने निवडली गेली आहे.

थोडक्यात काय तर दोन्ही राष्ट्रे परमेश्वराला सर्व सृष्टींचा विधाता समजत नाहीत, नसता काय कारण आहे, की ज्या स्वरूपात परमेश्वर सर्व सृष्टींचा विधाता म्हणवला जातो आणि फक्त इस्त्राईलींचा विधाता किंवा फक्त आर्यांचा विधाता म्हणवला जात नाही. तो एका विशिष्ट अशा राष्ट्राशी असा शाश्वत संबंध का प्रस्थापित करतो, जो उघडपणे पक्षपात करताना दिसून येतो. म्हणून या सिध्दांताच्या खंडणासाठी परम परमेश्वराने पवित्र कुरआनाला याच वचनापासून आरंभिले आहे की,

اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعَالَمِيْنَ

(अल् फातिहा-२)

आणि त्याने जागो जागी पवित्र कुरआन मध्ये उघड उघड स्पष्ट केले आहे, की ही गोष्ट सत्य नव्हे की, कोणत्याही विशिष्ट अशा राष्ट्रात किंवा देशात ईश्वराचे प्रेषीत येत राहिले आहेत. उलट परमेश्वराने कोणत्याही राष्ट्राला किंवा देशाला वंचित ठेवलेले नाही. आणि पवित्र कुरआना मध्ये वेगवेगळया उदाहरणाद्वारे नमूद करण्यात आले आहे, की ज्या प्रमाणे परमेश्वर प्रत्येक देशाच्या नागरिकांसाठी त्यांच्या परिस्थितीला अनुकूल त्यांचे शारिरीक प्रशिक्षण करत आला आहे, त्याचप्रमाणे त्याने प्रत्येक देशातील व राष्ट्रातील लोकांच्या प्रबोधनाने त्यांना लाभान्वित केले आहे. जसे की, तो पवित्र कुरआन मध्ये एक ठिकाणी प्रतिपादित करतो की,

وَاِنْ مِّنْ اُمَّةٍ اِلَّا خَلَا فِيْهَا نَذِيْرٌ
(अल् फातिर-२५)

अर्थात कोणतेही असे राष्ट्र नाही ज्यामध्ये प्रेषीत आणि संदेष्टे पाठविण्यात आले नाहीत.

म्हणून ही गोष्ट कुठलाही वादविवाद न करता स्वीकारण्या योग्य आहे, की तो सत्य आणि परिपूर्ण परमेश्वर, ज्यावर निष्ठा ठेवणे प्रत्येक भक्ताचे कर्तव्य आहे, तो सर्व सृष्टींचा विधाता आहे आणि त्याचे पालकत्व कोणत्याही एका राष्ट्रापर्यंत मर्यादित नाही. तसेच कुठल्याही विशिष्ट अशा युगापर्यंत किंवा देशापर्यंत मर्यादित नाही उलट तो सर्व राष्ट्रांचा विधाता आहे आणि सर्व युगांचा विधाता आहे आणि सर्व स्थानांचा विधाता आणि सर्व देशांचा तोच विधाता आहे. आणि सर्व कृपाप्रसादांचा तोच एक स्त्रोत आहे. आणि प्रत्येक शारिरीक आणि आध्यात्मिक सामर्थ्य त्याच्या पासूनच आहे आणि त्याच्या पासूनच सर्व अस्तित्वात असलेले जीव संगोपिले जातात. आणि प्रत्येक जीवतत्त्वाचा तो आसरा आहे.

परमेश्वराचा कृपाप्रसाद सार्वत्रीक आहे जो सर्व देशांना राष्ट्रांना आणि युगांना आपल्या कवेत घेवून आहे. हे या साठी घडले की, कोणत्याही राष्ट्राला तक्रार करण्याची संधी मिळू नये आणि ते असे म्हणू नये की, परमेश्वराने अमुक एका राष्ट्रावर उपकार केलेत पण आमच्या वर केले नाहीत किंवा अमुक एका राष्ट्राला त्याचा ग्रंथ प्राप्त झाला, जेणे करून ते त्या पासून उपदेश प्राप्त करतील परंतु आम्हाला प्राप्त झाला नाही किंवा अमुक एका काळात तो आपला संदेश आणि दिव्यवाणीतून साक्षात्कार प्रकट करत राहिला परंतु आमच्या काळात तो अदृश्य राहिला. आणि म्हणून त्याने आपला कृपाप्रसाद सार्वत्रिक करून सर्व तक्रारींना प्रतिउत्तर दिले. आणि आपले असे विशाल सद्‌गुण प्रदर्शित केले, की कोणत्याही राष्ट्राला आपल्या शारिरीक आणि आध्यात्मिक कृपाप्रसादापासून वंचित

ठेवले नाही. तसेच कोणत्याही युगाला दुर्दैवी ठरविले नाही.

म्हणून ज्या अर्थी आमच्या ईश्वराचे हे सद्‌गुण आहेत तर आम्हाला देखील त्याच सद्‌गुणांचे अनुकरण करणे योग्य आहे म्हणून हे देश बांधवांनो! ही संक्षिप्त पुस्तिका जिचे नाव 'पैगाम ए सुलह' अर्थात मैत्री संदेश आहे, अतिशय विनयपूर्वक आपणा सर्व बांधावांच्या सेवेत सादर करत आहे. आणि सच्च्या दिलाने प्रार्थना करण्यात येते की, तो परमश्वेर आपण सर्वांच्या मनामध्ये दिव्यसंदेश देवो आणि आमच्या सद्‌भावनेचे रहस्य तुमच्या मनावर प्रकट करो, जेणे करून तुम्ही या मित्रत्वाच्या उपहाराला कुठल्याही विशेष अशा स्वार्थ आणि मतलबी हेतूने प्रेरित समजू नये. प्रीय जणहो! परलोकाची गोष्ट तर सर्व साधारण लोकांपासून बहुतेकदा गुप्तच राहते आणि फक्त अशा लोकांवरच पारलौकिक जीवनाचे रहस्य उलगडते जे मृत्यु पूर्वीच मृत्यु पावतात; परंतु इहलोकातील पाप आणि पुण्याचे आकलन प्रत्येक दूरदृष्टी असलेल्या बुध्दीला होवू शकते. ही गोष्ट कोणापासूनही लपलेली नाही, की योगायोग अशी गोष्ट आहे की, जी संकटे कुठल्याही उपायाने दूर होवू शकत नाहीत आणि त्या कठीण परिस्थिचे कोणत्याही उपायाने निराकरण होत नाहीत, ते योगायोगाने सुटून जातात. म्हणून एखाद्या बुध्दिमताला ही गोष्ट योग्य नाही, की योगायोगाच्या उपहारापासून त्याने स्वत:ला वंचित ठेवावे. हिन्दू आणि मुसलमान हे या देशातील अशी दोन राष्ट्रे आहेत, की ही गोष्ट अशक्यप्रार्य आहे की कुठल्याही परिस्थितीत, समजा हिन्दू एकत्रित येवून मुसलमानांना या देशातून बाहेर घालून देऊ शकतील किंवा सर्व मुसलमान एकत्रित येऊन हिन्दूंना या देशातून तडीपार करू शकतील. उलट आता तर हिन्दू आणि मुसलमानांचा आपसात अतूट संबंध झाला आहे.

जर एकावर संकट आले तर त्याचा प्रभाव दुसऱ्यावरही पडू शकतो आणि जर एक समाज दुसऱ्या समाजाला फक्त आपल्या आत्मगौरवाने नीच ठरवण्याचा प्रयत्न करत असेल, तर तो स्वत:देखील नीच ठरण्यापासून

वाचणार नाही. आणि जर कोणी आपल्या शेजाऱ्याला सहानुभूती दाखवणार नाही तर त्याचा तोटा त्याला स्वत:ला देखील उचलावा लागेल. जी व्यक्ति तुम्हा दोन्ही समाजापैकी दुसऱ्या समाजाच्या विनाशाची इच्छा बाळगूण आहे, त्याचे उदाहरण त्या व्यक्ति सारखे आहे जी ज्या फांदीवर बसले आहे तीच फांदी कापत आहे. तुम्ही लोक ईश्वर कृपेने सुशक्षित देखील आहात. आता इर्षा सोडून प्रेम भावनेत उन्नत होणे तुम्हाला शोभून दिसते. आणि अवकृपा सोडून कृपावंत होणे तुमच्या बुध्दीमत्तेशी सुसंगत आहे. जगातील समस्या या, मरूभुमि मध्ये उन्हाळयाच्या दिवसात प्रखर अशा सुर्याच्या प्रकाशात प्रवास करण्यासमान आहे. म्हणून या कष्टप्रद प्रवासामध्ये एकमेकांच्या सहकार्याच्या शीतल पाण्याची आवश्यकता आहे, जो या तप्त अशा आगीला थंड करतो आणि तहानलेल्या स्थिती मध्ये मरणापासून वाचवतो.

अशा नाजुक स्थिती मध्ये हा लेखक आपणास समेटासाठी बोलवत आहे, की जेव्हा दोघांनाही सलोख्याची आवश्यकता आहे. जगावर वेगवेगळया प्रकारच्या आपत्ती कोसळत आहेत. भुकंप येत आहेत, दुष्काळ पडत आहेत आणि प्लेगने देखील आता पर्यंत आपली वाट सोडलेली नाही. आणि परमेश्वराने मला जी वार्ता दिली आहे ती देखील हीच आहे की, हे जग आपल्या दुष्कृत्यांपासून परावृत्त होणार नसेल आणि दुष्कर्मापासून पश्चाताप व्यक्त करणार नसेल, तर जगावर कठोराहून कठोर अशा आपत्ती येत राहतील आणि एक संकट अजून संपले नाही की लगेच दुसरे संकट पुढे येईल. शेवटी मानवमात्र घोर चिंतेत पडतील की आता काय होणार आहे आणि अनेक संकटांमध्ये घेरले जावून वेडेपिसे होतील. म्हणून हे देश बांधवांनो! ते दिवस येण्यापूर्वीच सजग व्हा आणि हिन्दू आणि मुसलमानांनी आपसात सलोखा निर्माण करा. आणि ज्या समाजामध्ये अतिरेकी प्रवृत्ती आहे की ज्यामुळे समेट घडून येवू शकत नाही, त्या समाजाने ती अतिरेकी प्रवृत्ती त्यागली पाहीजे अन्यथा आपसातील शत्रुत्त्वाचा संपूर्ण अपराध त्याच

समाजाच्या मानगुटीवर राहील.

जर कोणी असे विचारत असेल की, असा समेट कसा काय घडून येऊ शकतो, विशेषत: अशा वेळी की जेव्हा आपसातील धार्मिक मतभेद या समेटाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे, जो दिन प्रतिदिन मनामध्ये फूट पाडत आहे.

मी याच्या उत्तरात असे म्हणेन की, वास्तविक पाहता धार्मिक मतभेद त्याच मतभेदाचे नाव आहे ज्याचे मूळ दोन्ही बाजूने बुध्दी आणि न्याय आणि प्रकट गोष्टींच्या संदर्भात आहे; अन्यथा मानवाला याच कारणासाठी बुध्दीमत्ता दिली आहे, की त्याने अशा मार्गांचा अवलंब करावा जो बुध्दी आणि न्यायापासून विपरीत नाही. आणि प्रकट आणि स्पष्ट जाणवणाऱ्या गोष्टींच्या विरूध्द नाही. छोटे मोठे मतभेद समेटाच्या मार्गात अडथळे ठरू शकत नाहीत, उलट असे मतभेदच समेटाच्या मार्गात अडथळे ठरू शकतात, की ज्यामध्ये एखाद्या माननीय प्रेषीतांवर किंवा सन्माननीय धर्म ग्रंथांवर अपमानजनक हल्ले केले जातात.

या शिवाय सलोखा प्रीय लोकांसाठी एक आनंदाचा क्षण आहे की, इस्लामची जी शिकवण आहे ती शिकवण वेदांच्या कुठल्या ना कुठल्या शाखेत आढळून येते. उदाहरणार्थ, जरी नवनिर्मित धर्म, आर्यसमाजाची ही धारणा आहे, की वेदांनतर ईशवाणी पूर्णत: बंद झाली आहे; परंतु जे हिन्दू धर्मांमध्ये वेळो वेळी अवतार जन्माला येत राहिले, ज्यांचे अनुयायी कोट्यावधी संख्येने याच देशात दिसून येतात, त्यांनी या धारणेला आपल्यावर प्रकट झालेल्या ईशवाणीने खोटे ठरविले आहे. जसे की, एक आदरणीय अवतार जो या देशात आणि बंगालमध्ये देखील अतिशय आदरणीय आणि प्रतिष्ठीत मानला जातो, ज्याचे नाव '**श्री कृष्ण**' आहे, ते स्वत:वर ईशवाणी होत राहिल्याची घोषणा करतात आणि त्यांचे अनुयायी देखील त्यांना फक्त ईश्वरीय संदेष्टाच मानत नाहीत तर परमेश्वर सुध्दा मानतात. परंतु ही गोष्ट संशयातीत आहे, की श्री कृष्ण हे आपल्या युगाचे प्रेषीत

आणि अवतार होते आणि ईश्वर त्यांच्याशी संवाद साधत होता.

त्याचप्रमाणे आजच्या काळात देखील हिन्दू लोकांच्या समाजा मध्येच '**बाबा गुरू नानक साहेब**' ज्यांची प्रतिष्ठा आणि प्रसिध्दी या देशात सर्वत्र आहे आणि ज्यांचे अनुकरण करणारे लोक जे शीख म्हणवले जातात त्यांची संख्या या देशात २० लाखांपेक्षा कमी नाही. बाबा नानक साहेब आपल्या जनमसाखी आणि ग्रंथांमध्ये उघड उघड ईशवाणी प्राप्त झाल्याची घोषणा करतात; एवढेच नव्हे तर एका जनमसाखी मध्ये त्यांनी लिहले आहे की, मला ईशवाणी द्वारे ज्ञात झाले आहे, की इस्लाम हा सत्य धर्म आहे. यामुळेच त्यांनी 'हज्ज' यात्रा देखील केली आणि सर्वच इस्लामी सिध्दांतांचे अनुकरण केले. आणि नि:संदिग्धपणे सिध्द झाले आहे, की त्यांच्या द्वारे चमत्कार आणि साक्षात्कार प्रकट झाले आहेत आणि या गोष्टीमध्ये सुध्दा संशयाला जागा नाही की बाबानानक साहेब हे एक प्रामाणिक आणि सिध्द पुरूष होते. आणि अशा लोकांपैकी होते ज्यांना परमेश्वर आपल्या प्रेमाचे अमृत पाजतो. ते हिन्दू समाजामध्ये फक्त या गोष्टीची साक्ष देण्यासाठी जन्मले होते की, इस्लाम हा ईश्वरीय धर्म आहे. जी व्यक्ति त्यांचे 'डेरा बाबानानक' येथे असलेले पवित्र अवशेषांचे अवलोकन करेल त्याला दिसून येईल की त्यांनी अतिशय प्रखरपणे कलमा '**ला इलाहा इल्लल्लाहा मुहमदुर्रसूलूल्लाह**' ची साक्ष दिली आहे. तसेच ते पवित्र अवशेष जे 'गुरू हरसहाय' जिल्हा फिरोजपूर येथे ठेवले आहेत, त्यांचे अवलोकन केल्यानंतर त्या मध्ये एक पवित्र कुरआन देखील आहे, जो ही गोष्ट सिध्द करतो की बाबानानक यांनी आपल्या पवित्र आत्मा आणि पवित्र स्वाभावामुळे आणि आपल्या पवित्र साधने मुळे हे रहस्य जाणून घेतले होते, जे शब्दपंडितांवर प्रकट होत नाही. आणि त्यांनी ईशवाणीची घोषणा करून तसेच ईश्वराकडून साक्षात्कार आणि चमत्कार प्रकट करुन या धारणेचे समूळ खंडन केले की वेदांनंतर आता ईश्वरीय संदेश आणि साक्षात्कार अवतरीत होत नाहीत. नि:संशयपणे बाबा गुरू

नानकांचे अस्तित्व हिन्दू समाजासाठी परमेश्वराकडून एक कृपा प्रसादच होता. आणि असे समजून घ्या की, हिन्दू धर्मातील तो शेवटचा अवतार होता, ज्याने इस्लाम विरूध्द हिन्दूंच्या मनामध्ये जी घृणा आहे ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला; परंतु या देशाचे हे देखील दुर्दैव आहे की, हिन्दू धर्मीयांनी बाबानानक साहेब यांच्या शिकवणुकींपासून लाभ उचलला नाही. उलट पंडितांनी, ते जागो जागी इस्लाम ची प्रशंसा का करतात म्हणून त्यांना त्रास दिला. ते हिन्दू धर्म आणि इस्लाम मध्ये समेट घडवण्यासाठी आले होते; परंतु दुर्दैवाने त्यांच्या शिकवणुकीकडे कोणीही लक्ष दिले नाही. जर त्यांच्या व्यक्तित्वापासून आणि शिकवणुकीपासून योग्य तो लाभ उचलला गेला असता तर आज हिन्दू आणि मुसलमान सर्व एक झाले असते. खेदपूर्णपणे म्हणावे वाटते की अशी प्रामाणिक व्यक्ति जगात आली आणि निर्वाण पावली. या कल्पनेने देखील गहीवरून येते; परंतु मूढ लोकांनी त्याच्या तेजापासून प्रकाश प्राप्त केला नाही.

तथापि तो ही गोष्ट सिध्द करून गेला, की ईश्वरीय संदेश आणि साक्षात्कार कधीही बंद होत नसतात. आणि ईश्वराचे संकेत त्याच्या सन्माननीय विभूतींच्या द्वारे नेहमीच प्रकट होत असतात. आणि या गोष्टीची साक्ष देऊन गेला की इस्लामशी शत्रुत्व हे तेजाशी शत्रुत्व आहे.

अशाच प्रकारे मी स्वत: देखील स्वानुभावावरून सांगू शकतो, की परमेश्वराचे साक्षात्कार आणि त्याचे संदेश या काळामध्ये देखील अजिबात बंद झाले नाहीत, उलट परमेश्वर पूर्वी जसा बोलत होता तसाच तो आजही बोलत आहे आणि जसा तो पूर्वी ऐकत होता तसाच तो आजही ऐकत आहे. असे अजिबात नाही की त्याची ही शाश्वत गुणवैशिष्टये आज निलंबित झाली आहेत. मी जवळपास तीस वर्षापासून ईश्वराशी संवाद आणि संकेतापासून लाभान्वित होत आहे. आणि माझ्याद्वारे त्याने शेकडो संकेत प्रकट केले आहेत, जे हजारो साक्षीदारांनी अनुभवले आहेत. तसेच ग्रंथांमध्ये आणि वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्दी पावले आहेत. आणि असा

एकही समाज नाही ज्याने कुठल्या ना कुटठल्या संकेतांची साक्ष दिली नाही.

आता इतक्या मोठया प्रमाणात आणि सातत्यपूर्ण साक्षी नंतर, आर्य समाजाची ही शिकवण, जी निष्कारण वेदांवर थोपवली जाते, कशी काय स्विकारण्यायोग्य आहे. जेव्हा ते म्हणतात की, ईश्वराच्या सर्व संदेशांची आणि संकेतांची वेदांवर समाप्ती झाली आहे आणि त्या नंतर फक्त दंतकथा आणि आख्यायीकावरच संपूर्ण निर्भरता आहे. याच आपल्या धारणेला हाताशी घेऊन ते लोक असे म्हणतात की, वेदाशिवाय या जगामध्ये जेवढे म्हणून ग्रंथ ईश्वरीय संदेशावर आधारित म्हणवले जातात ते सर्व, (ईश्वर क्षमा करो) मानव निर्मित आहेत. वास्तविक पाहता ते ग्रंथ वेदांपेक्षा कितीतरी मोठया प्रमााणात आपल्या सत्येतेचे पुरावे प्रस्तूत करतात. आणि परमेश्वराच्या सहकार्य आणि मदतीचा हात त्यांच्या सोबत आहे. आणि परमेश्वराच्या असाधारण संकेताद्वारे त्यांच्या सत्यतेची साक्ष दिली जाते. मग काय कारण आहे की, वेद तर परमेश्वराचा संदेश आहे परंतु ते अन्य ग्रंथ परमेश्वरीय संदेश नाहीत. ज्या अर्थी ईश्वराचे अस्तित्व अतिशय सखोल व गूढ रहस्यमय आहे त्या अर्थी बुध्दीची सुध्दा अशीच अवधारणा आहे, की तो आपले अस्तित्व सिध्द करण्यासाठी फक्त एकाच ग्रंथावर निर्भर न राहता वेगवेगळया देशांमध्ये आपल्या संदेष्टयांचे चयन करून त्यांच्यावर आपले संदेश आणि वाणी त्यांना प्रदान करतो, जेणे करून मानवमात्र, जे अतिशय दुर्बळ आणि मंदमती आहेत, जे शीघ्र संशयग्रस्त होतात, ते श्रध्दा स्वीकारण्यापासून वंचित न राहोत.

या गोष्टीला सुबुध्दमती अजिबात स्वीकार करत नाही की, तो परमेश्वर जो सर्व सृष्टीचा विधाता आहे, जो आपल्या सुर्याद्वारे पूर्व पश्चिम सर्व दिशांना प्रकाशमान करतो आणि आपल्या पर्जन्यांद्वारे प्रत्येक देशाच्या आवश्यकता अनुसार जलवृष्टी करतो, तो आध्यात्मिक प्रबोधनासाठी इतका संकुचित ह्रदयी आणि कृपण कसा होवू शकतो की फक्त नेहमी करिता

एकाच देशात आणि एकाच राष्ट्रात आणि एका भाषेची निवड करतो आणि मी हे समजू शकत नाही, की हे कोणत्या प्रकारचे तर्क आहे आणि कोणत्या प्रकारचे तत्वज्ञान आहे, की परमेश्वर प्रत्येक मानवाची प्रार्थना जो स्वतःच्या भाषेमध्ये करतो, ती समजू तर शकतो आणि त्याचा तिरस्कार करत नाही; परंतु या गोष्टीचा त्याला तिटकारा आहे, की फक्त वैदिक संस्कृत शिवाय अन्य कोणत्याही भाषेत तो लोकांच्या मनावर आपले संदेश प्रकट करत नाही. हे तत्वज्ञान आणि वेदविद्या एक असे कोडे आहे की, जे आजपर्यंत कोणत्याही मानवाला सोडवता आले नाही.

मी वेदांना अशा प्रत्येक बाबींपासून मुक्त समजतो, की त्याने कधीही आपल्या कोणत्याही पृष्ठावर अशी शिकवण दिली असेल की जी बुध्दीमत्तेच्या विपरीत किंबहुना परमेश्वराच्या पवित्र अस्तित्वावर कृपणता आणि पक्षपाताचे कलंक लावित असेल. उलट वस्तुस्थिती ही अशी आहे की, जेव्हा कोणत्याही ईश्वरीय ग्रंथावर एक प्रदीर्घ काळ निघुन जातो तेव्हा त्याचे अनुयायी कधी आपल्या मूर्खपणामुळे किंवा आपल्या वयैक्तिक स्वार्थामुळे चुकून किंवा जाणूनबुजून अशा ग्रंथावर स्वतःकडून काही टिपण्ण्या चढवतात. आणि ज्या अर्थी अशी टिका-टिप्पणी करणारे वेगवेगळया विचाराचे लोक असतात, म्हणून एका धर्मांतून हजारो धर्मांची उत्पत्ती होते.

ही गोष्ट विचित्र तर आहेच की ज्याप्रमाणे आर्य समाजी लोक ही श्रध्दा बाळगतात की, नेहमीच आर्यांच्या घराण्यात आणि आर्यवृत्ता पर्यंतच ईशवाणी मर्यादित आणि सीमित राहिली आहे. आणि सदैव वैदिक संस्कृतच ईश्वरीय संदेशासाठी विशिष्ट अशी भाषा राहिली आहे आणि तीच परमेश्वराची भाषा आहे. असेच विचार यहुदी लोकांचे आपल्या घराण्यांबद्दल आणि ग्रंथांबद्दल आहेत. त्यांची देखील अशीच धारणा आहे की, परमेश्वराची मूळ भाषा 'हिब्रु' आहे आणि ईशवाणी नेहमीच फक्त 'बनी इस्त्राईल' आणि त्यांच्या देशापर्यंत सीमित आहे. आणि जी व्यक्ति

त्यांच्या घराण्यातील नाही आणि त्यांची भाषा भिन्न आहे, तो जर संदेष्टा असण्याची घोषणा करत असेल तर तो, (ईश्वर क्षमा करो) लबाड ठरवला जातो.

म्हणून हे सातत्य विस्मयजनक नाही काय, की या दोन्ही राष्ट्र आपापल्या धारणे मध्ये एकच समान विचारावर दृढ झालेले आहेत. याच प्रमाणे जगामध्ये असे अनेक पंथ आहेत जे अशा विचाराचे अनुकरण करतात उदाहरणार्थ, पारशी लोक, जे आपल्या धर्माचे अस्तित्व वेद पूर्व अब्जावधी वर्षा पूर्वीचे आहे, असे मानतात. या वरून असे दिसून येते की हा विचार (की नेहमी करता आपला देश आणि आपले घराणे आणि आपल्या ग्रंथांची भाषा हीच ईश्वराच्या संदेश आणि संवादासाठी विशेष ठरवली गेली आहे) फक्त पक्षपात आणि ज्ञानाच्या कमतरतेमुळे उत्पन्न झाली आहे. ज्या अर्थी पूर्वी जगावर असा काळ देखील होऊन गेला आहे की एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या परिस्थिती बद्दल आणि एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राबद्दल अनभिज्ञ होते, त्या अर्थी या चूकीच्या अवधारणे मुळे प्रत्येक समाजाला ईश्वराकडून एखादा ग्रंथ प्राप्त झाला किंवा ईश्वराचा संदेष्टा आणि प्रेषीत त्या समाजात अवतरीत झाला तर त्या समाजाने असाच विचार केला की, जे काही परमेश्वराकडून उपदेश मिळणे आवश्यक होते ते हेच आहे आणि ईश्वरीय ग्रंथ फक्त त्यांच्याच घराण्याला आणि त्यांच्याच राष्ट्राला दिला गेला आहे आणि संपूर्ण जग या पासून वंचित आहे.

या विचारामुळे जगाचे फार नुकसान झाले आहे. वास्तविक पाहता आपसातील ईर्षा आणि घृणेचे बीज जे समाजच्या मनामध्ये रूजत गेले ते याच विचारामुळे घडले. एका प्रदीर्घ काळापर्यंत एक समाज दुसऱ्या समाजापासून अनभिज्ञ राहिला आणि एक देश दुसऱ्या देशापासून अलिप्त आणि अपरिचित राहिला, इथपर्यंत की आर्यावर्तातील विद्ववानांची अशी धारणा होती की हिमालय पर्वताच्या पलीकडे लोकवस्तीच नाही.

मग जेव्हा ईश्वराने हे त्यांच्या मधील अज्ञानाचे पटल दूर केले आणि पृथ्वीवर च्या लोकवस्ती बद्दल लोकांच्या माहितीमध्ये भर पडत गेली तर तो असा काळ होता जेव्हा ही चूकीची वैशिष्टये जी ईश्वरीय ग्रंथांबद्दल आणि आपल्या ऋषीं आणि प्रेषीतांबद्दल आपल्या मनांमध्ये लोकांनी साकारली होती आणि आपल्या श्रध्देमध्ये त्यांना सामील करून ठेवली होती ती त्यांच्या मनामध्ये खूप दृढ आणि पाषाणवत झाली होती. आणि प्रत्येक समाज असाच विचार करत होता की, परमेश्वराचे मूख्यालय नेहमीकरिता त्यांच्याच देशात राहिले आहे. आणि जसे की त्या काळात बहुतांश समाजामध्ये रानटी प्रवृत्ती प्रभावी होती आणि एखाद्या प्राचीन रूढी आणि परंपरेला विरोध झाल्यास त्याचे प्रतिउत्तर तलवारीने दिले जात होते, म्हणून कोणाची बिशाद होती की प्रत्येक समाजाच्या आत्मप्रौढीच्या मस्तीला थंड करून त्यांच्यात समेट घडून आणू शकेल. '**गौतम बुध्द**' ने अशा समेटाचा प्रयत्न केला होता आणि ते या सिध्दांताला मान्य करत नव्हते की, जे काहीं आहे ते फक्त वेदच आणि त्याच्या पुढे काहीच नाही. तसेच तो राष्ट्र आणि देश आणि घराण्याच्या विशेषतत्वाला मान्यता देत नव्हते. अर्थात, त्यांचा हा धर्म नव्हता की जणू वेदावरच सर्व काही निर्भर आहे आणि हीच भाषा आणि हाच देश आणि हाच ब्राह्मण, परमेश्वराच्या संदेशासाठी नेहमी करिता त्याच्या न्यायालयात नोंदणीकृत आहे. त्यामुळे त्यांना या मतभेदा मुळे खूप त्रास सहन करावं लागलं आणि त्यांचे नाव एक निरीश्वरवादी आणि नास्तिक मतावलंबी ठरविले गेले. जसे की, आजकाल युरोप आणि अमेरिकेमध्ये सर्व संशोधक, जे येशू च्या ईश्वरत्वाला मान्यता देत नाहीत आणि त्यांची बुध्दी हे मान्य करत नाही की, परमेश्वराला देखील सुळावर चढवले जावू शकते, ते सर्व विद्वान पादरी लोकांच्या दृष्टीने निरीश्वरवादी आहेत.

अशाचप्रकारे बुध्दाला देखील निरीश्वरवादी ठरविले गेले आणि जसे की उपद्रवी विरोधकांचा प्रघात आहे, जनसामान्यांमध्ये घृणा उत्पन्न करण्यासाठी

त्यांच्यावर अनेक आरोप लावले गेले. शेवटी बुध्द जो आर्यावर्तापासून, जी की त्याची जन्मभूमी आणि मातृभुमी होती, निष्कासित झाला. आणि आजपर्यंत हिन्दू लोक बुध्द धर्म आणि त्याच्या यशाकडे अतिशय घृणेने आणि तिरस्काराने पहात आहेत; परंतु येशू ख्रिस्ताच्या वचनां प्रमाणे, ''**प्रत्येक प्रेषीत आपल्या मातृभूमी शिवाय अन्यत्र अपमानित केला जात नाही**.'' बुध्दाने अन्य देशाकडे स्थलांतर केले आणि मोठे यश प्राप्त केले. जसे की म्हटले जाते की, जगातला तिसऱ्या मोठया भूभागावर बुध्द धर्म प्रस्थापित आहे आणि बहुसंख्य अनुयायाच्या दृष्टीने या धर्माचे केंद्र चीन आणि जापान आहे. परंतु तो दक्षिण रशिया आणि अमेरिकेपर्यंत सुध्दा प्रचलित आहे. आता आम्ही परत एकदा मूळ विषयाकडे येऊन लिहितो की, ज्या काळामध्ये एक धर्म दुसऱ्या धर्मापासून अनभिज्ञ होता अशा अनभिज्ञतेमुळे ही गोष्ट निश्चित होती की प्रत्येक राष्ट्र आपला धर्म आणि आपल्या ग्रंथावरच निर्भर राहत होता; परंतु अशा निर्भरते मुळे शेवटी परिणाम असा झाला की जेव्हा एक देश दुसऱ्या देशाच्या अस्तित्वाने परिचित झाला आणि विविध देशातील लोक एकमेकाच्या धर्माशी परिचित झाले, तेव्हा त्यांच्यासाठी हे ठरविणे खूप कठीण झाले की, एका देशाचा धर्म दुसऱ्या देशाच्या सत्येस मान्यता देवू शकेल. कारण प्रत्येक धर्मासाठी काव्यात्मक अतिशयोक्त वैशिष्टये आणि प्रतिष्ठा ठरून गेल्या होत्या आणि त्यांचे निवारण करणे सहज शक्य कार्य नव्हते. म्हणून प्रत्येक धर्म अनुयायींनी अन्य धर्माला खोटे ठरवण्यावर भर दिला. 'झींदाएवेस्तेच्या धर्माने' ''आम्हीच आहोत अन्य कोणीही नाही'' ची पताका उभारली. आणि प्रेषीतांच्या अवतरणाला आपल्या घराण्यापर्यंतच सीमित ठेवले. आणि आपल्या धर्माचा इतिहास इतका प्राचीन करून सांगितला की वेदाचा इतिहास सांगणारे त्यांच्या पुढे खजील झाले.

इकडे इब्रानी लोकांच्या धर्माने परिसीमाच गाठली आणि नेहमी करता ईश्वराचे केंद्रस्थान सिरिया या देशाला ठरवून टाकले. आणि नेहमीच

फक्त त्यांच्याच घराण्यात पवित्र लोक या लायक ठरविण्यात आले की, तेच देशाच्या प्रबोधनासाठी पाठवले जातील. परंतु हे प्रबोधन फक्त 'बनी इस्त्राईल' पर्यंतच सीमित राहिल असे आदेशित केले आणि त्यांच्याच घराण्यात ईशवाणी आणि ईश्वरीय साक्षत्कारांना मर्यादित करून टाकले आणि जो कोणी अन्य प्रकट होईल त्याला लबाड ठरविले गेले.

अशाच प्रमाणे आर्यावर्ता मध्ये देखील तंतोतंत असेच विचार प्रसिध्दी पावले, जे इस्त्राईली मध्ये प्रचलित होते आणि त्यांच्या श्रध्देनुसार परमेश्वर फक्त आर्यावर्तांचाच स्वामी आहे आणि असा स्वामी ज्याला अन्य देशाचे ज्ञानच नाही आणि विना पुरावा ही गोष्ट मान्य केली जाते की, जेव्हा पासून परमेश्वर अस्तित्वात आहे तेव्हा पासून त्याला आर्यावर्तांचेच हवा-पाणी पसंत आहे. त्याची अजिबात इच्छा होत नाही की, अन्य देशाचा देखील प्रवास करावा. आणि कधीतरी त्या पामरांची देखील विचारपूस करावी, ज्यांना निर्माण करून तो विसरून गेला आहे.

मित्रांनो! जरा ईश्वरासाठी तरी विचार करून पहा की, हे सिध्दांत असे आहेत का की ज्याला मानवी स्वभाव स्वीकार करेल किंवा सद्सद्विवेकबुध्दी त्याला थारा देवू शकेल. मला समजत नाही की हे कोणते शहाणपण आहे की, एकीकडे ईश्वराला संपूर्ण जगाचा विधाता मानावे आणि पुन्हा त्याच तोंडाने असेही म्हणावे की त्याने संपूर्ण जगाच्या पालकत्वापासून हात आखडून घेतला आहे आणि फक्त एका विशिष्ट राष्ट्र आणि देशावरच त्याची कृपा आहे. शहाणे लोकहो! स्वतः न्याय करा की काय परमेश्वर च्या भौतिक निसर्गनियामांत याचा काही पुरावा मिळतो काय, मग त्याचे आध्यात्मिक नियम असे पक्षपाती कसे असू शकतात.

आणि जर बुध्दीचा वापर केल्यास प्रत्येक कार्य, बरे की वाईट हे त्याच्या परिणामावरून समजून येवू शकते. म्हणून मला या गोष्टीचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही की, परमेश्वराच्या पवित्र प्रेषीतांचा

अपमान करणे आणि त्यांना शिव्या-शाप देणे, ज्यांचे अनुकरण आणि अनुसरण करणाऱ्यांमध्ये प्रत्येक भागातील कोटयावधी लोक सामील आहेत, याचा परिणाम कसा होईल. आणि सरते शेवटी याचे फलीत काय आहे. कारण कोणतेही राष्ट्र असे नाही ज्यांने याच्या परिणामांचे काहीं ना काही अवलोकन केलेले नाही.

हे प्रीय जनहो! प्राचीन अनुभव आणि वारंवार केलेल्या परिक्षणावरून ही गोष्ट सिध्द झालेली आहे की, विभिन्न राष्ट्रांच्या प्रेषीतांना आणि संदेष्टयांना अपमानित करणे आणि त्यांना शिव्या शाप देणे, हे असे विष आहे की जे अंतिमतः फक्त शरीरालाच नष्ट करत नाही तर आत्म्याला देखील नष्ट करून धर्म आणि भौतिक जगाचा देखील नाश करतो. तो देश कधीच सुरक्षित आणि सलामत जीवन जगू शकत नाही ज्याचे नागरिक एकमेकाच्या धार्मिक मार्गदर्शकांची अवहेलना आणि मानहानी करण्यात व्यस्त राहतात. आणि त्या राष्ट्रांमध्ये खरा एकोपा अजिबात निर्माण होवू शकत नाही ज्यांच्यापैकी एक राष्ट्र किंवा दोघेही एकमेकाच्या प्रेषीत किंवा ऋषी किंवा अवतार यांना दूषणे देऊन किंवा अपशब्दाने उल्लेख करत राहतात. आपल्या प्रेषीताची किंवा मार्गदर्शकाची अवहेलना होताना पाहुन कोणाला राग येणार नाही विशेषतः मुसलमान एक असे राष्ट्र आहे की, जरी तो आपल्या प्रेषीताला ईश्वर किंवा ईश्वराची संतान मानीत नसले; तरी पण पवित्र पैगंबरांना सर्व पवित्र मानवांहूनही पवित्रतर मानतात, ज्यांनी आईच्या पोटातून जन्म घेतला आहे. म्हणून एका सच्च्या मुसलमानाशी सलोखा करणे फक्त अशाच परिस्थितीतच शक्य होवू शकते जेव्हा त्यांच्या प्रेषीता संदर्भात चर्चा होत असताना त्यांचा नामोल्लेख अतिशय आदराने आणि सन्मानाने केला जावा.

आणि आम्ही लोक इतर राष्ट्रांच्या प्रेषीतांच्या बाबतीत कधीही अपशब्दांचा वापर करत नाही. उलट आमची श्रध्दा हीच आहे की, जेवढे प्रेषीत म्हणून जगात वेगवेगळया राष्ट्रांमध्ये आले आहेत आणि कोटयावधी

लोकांनी त्यांना मान्यता दिली आहे आणि जगाच्या कोणत्या ना कोणत्या भागात त्यांच्या प्रती प्रेम आणि आदरभाव व्यक्त केला जातो आणि हे एका प्रदीर्घ काळापासून हे प्रेम आणि ही श्रध्दा व्यक्त होत आली आहे. तर फक्त एवढा एकच पुरावा त्यांची सत्यता सिध्द करण्यासाठी पुरेसा आहे. कारण जर ते ईश्वराकडून नसते तर त्यांना कोटयावधी लोकांच्या मनामध्ये श्रध्दा निर्माण करण्यात कधीच यश आले नसते. ईश्वर कधीही आपल्या मान्यवर दासांचा जो सम्मान आहे तो इतरांना अजिबात देत नाही. आणि जर एखादी लबाड व्यक्ति त्या मंचकावर आरूढ होण्याचा प्रयत्न करत असेल तर लवकरच ती विनाश पावते आणि नष्ट होवून जाते.

यामुळेच आम्ही वेदांना देखील ईश्वरीय ग्रंथ मानतो आणि त्यांच्या ऋषींना आदरणीय आणि सन्माननीय समजतो. जरी आम्हाला हे दिसून येत आहे की, वेदांची शिकवण पूर्णपणे कोणत्याही पंथाला ईश्वराप्रती समर्पित बनवू शकत नाही आणि बनवू शकलीही नव्हती आणि जे लोक या देशामध्ये मूर्तिपूजक किंवा अग्निपूजक किंवा सूर्यपूजक किंवा गंगेची पूजा करणारे किंवा हजारो देवतांची पूजा करणारे किंवा जैनमतावलंबी किंवा शाक्त मतावलंबी आढळून येतात, ते सर्व लोक आपले धर्म वेदाशीच निगडीत करतात. आणि वेद हा एक असा सर्वव्यापी ग्रंथ आहे की हे सर्व पंथ त्यातूनच आपल्याला पाहिजे तो अर्थ काढत असतात. परंतु ईश्वराच्या शिकवणीनुसार आमची दृढ श्रध्दा आहे की, वेद हे मानव निर्मित लबाडी नाहीत. मानव निर्मित लबाडी मध्ये कधीही एवढे सामर्थ्य नसते की ते कोटयावधी लोकांना आपल्याकडे आकर्षित करून घेवू शकेल. आणि पुढे एक शाश्वत परंपरा निर्माण करू शकेल. जरी आम्ही वेदामध्ये पाषाण पूजेचा उल्लेख कुठेही वाचला नाही, तरी परंतु नि:संशयपणे अग्नि, वायू, जल, चंद्र व सूर्य यांच्या पूजनाच्या उल्लेखाने वेद व्यापुन राहिले आहे. आणि कोणत्याही श्रुतीमध्ये या वस्तूंच्या पूजनाला विरोध आढळून येत नाही. आता हा निर्णय कोण करावा की, हिन्दू धर्मातील अन्य सर्वपंथ

खोटे असून हा नवीन पंथ, आर्य समाजच, खरा आहे. आणि जे लोक वेदाप्रमाणे या वस्तूंची पूजा करतात त्यांच्याकडे या गोष्टीचा भक्कम पुरावा आहे, की या गोष्टींच्या पूजा करण्याचा स्पष्ट उल्लेख वेदांमध्ये आढळून येतो. आणि त्याला कोठेही विरोध दिसून येत नाही. आणि हे म्हणणे की, हे सर्व परमेश्वराचेच नाव आहे, हा आता पावेतो फक्त एक दावा आहे, जो अजून पर्यंत स्पष्टपणे सिध्द झालेला नाही आणि जर सिध्द झाला असता तर मग काहीच कारण नाही, की मोठ मोठे काशीचे पंडित आणि दुसऱ्या शहरांचे पंडित आर्यांच्या या श्रध्देला मान्य न करत. गेल्या तीस वर्षाच्या प्रयत्नानंतर देखील फारच थोडया हिन्दूंनी आर्य धर्माचा स्वीकार केला आहे आणि सनातन धर्म आणि इतर हिन्दू पंथांच्या तुलनेत आर्य समाजी इतक्या अल्पसंख्येत आहेत, की जणू काहीच नाहीत. आणि त्यांचा अन्य हिन्दू पंथावर मोठा प्रभाव देखील नाही. त्याचप्रमाणे जी 'नियोग' ची शिकवण वेदांशी संदर्भीत केली जाते, ही एक गोष्ट देखील अशी आहे, जी मानवी स्वाभिमान आणि सत्वशीलता त्याला मान्यता देवू शकत नाही. परंतु जसे की मी आताच स्पष्ट केले आहे की, ही गोष्ट आम्हाला अजिबात मान्य नाही की वस्तुतः ही शिकवण वेदांचीच आहे. उलट आमच्या सद्भावनेमुळे आम्ही जोरदारपणे हेच म्हणू इच्छितो की, अशा सर्व शिकवणी काहीं स्वार्थां पोटी नंतरच्या काळात वेदांमध्ये प्रक्षिप्त करण्यात आल्या आहेत. आणि जसे की वेद निर्माण होवून हजारो वर्ष झाले आहे यामुळे हे शक्य आहे की वेगवेगळया काळामध्ये काहीं वेदाच्या भाष्यकारांनी नवीन प्रकारच्या काहीं गोष्टी समाविष्ट केल्या असतील किंवा वगळल्या असतील. म्हणून आमच्यासाठी वेदाच्या सत्यतेसाठी एवढाच पुरावा पर्याप्त आहे की, आर्यावर्तातील कोटयावधी लोक हजारो वर्षापासून त्याला ईशवाणी म्हणून मान्यता देतात. आणि हे अशक्य आहे की असा सम्मान कोणत्याही अशा ग्रंथाला प्राप्त होवू शकेल जो एखाद्या लबाड व्यक्तिने निर्माण केला असेल.

आणि मग जेव्हा आम्ही या सर्व त्रुटी समोर असताना देखील ईशभयापोटी वेदांना ईशवाणी मानतो आणि जी काहीं याच्या शिकवणी मध्ये चूका आढळून येतात त्या सर्व चूका वेदांच्या केलेल्या भाष्यकारांनी केलेल्या चूका समजतो, तर मग पवित्र कुरआन जो सुरूवातीपासून शेवटा पर्यंत एकेश्वरवादाने व्यापून राहिला आहे आणि त्यात कोठेही सूर्य, चंद्र वगैरेंच्या उपासनेची शिकवण नाही, उलट स्पष्ट शब्दात म्हटले आहे की,

لَا تَسْجُدُوْا لِلشَّمْسِ وَلَا لِلْقَمَرِ وَاسْجُدُوْا لِلّٰهِ الَّذِىْ خَلَقَهُنَّ

( हा मीम सजदः-३८)

अर्थात-सूर्याची उपासना करू नका आणि चंद्राचीही करू नका आणि त्याची उपासना करा ज्याने यांना निर्माण केले आहे. याशिवाय पवित्र कुरआन ईश्वराच्या पुरातन संकेतांचे आणि ताजा संकेतांचे पुरावे आपल्या सोबत बाळगतो आणि तो ईश्वराचे अस्तित्व दाखवण्यासाठी एक आरसा आहे. मग यावर रानटीपणाने का हल्ले केले जातात. मग का आमच्याशी तोच व्यवहार केला जात नाही जो आम्ही आर्य लोकांशी करत आहोत. आणि कशामुळे शत्रुत्वाचे आणि वैरभावनेचे बीजारोपण देशामध्ये केले जात आहे. याचे चांगले परिणाम होतील अशी आशा बाळगता येते का? जर एखादी व्यक्ति तुम्हाला फूल देत असेल तर त्याच्यावर दगड फेकणे आणि जे दुध देत असतील त्यांच्यावर मुत्र फेकणे हा सद्‌चार आहे का?

जर अशाप्रकारे सलोखा निर्माण करण्यासाठी हिन्दू लोक आणि आर्य समाजी तयार असतील की, ते आमच्या पवित्र प्रेषीत महंमद पैगंबर (स.) यांना ईश्वराचा सच्चा संदेष्टा म्हणून मान्यता देतील आणि या पुढे त्यांचा अपमान आणि अवहेलना करणे सोडून देतील, तर मी अशा करारनाम्यावर सर्व प्रथम हस्ताक्षर करण्यास तयार आहे की, आम्ही अहमदी संप्रदायाचे लोक नेहमीच वेदांचा स्वीकार करत राहू आणि वेद तसेच त्यातील ऋषींचा आदर आणि प्रेमाने त्यांचा नामोल्लख करत राहू. आणि जर का

आम्ही असे केले नाही तर एक मोठी रक्कम, जी तीन लाख रूपया पेक्षा कमी नसेल, दंड म्हणून हिन्दू लोकांच्या सेवेत अदा करू. आणि जर हिन्दू लोक मनापासून आमच्याशी समेट करू इच्छित असतील तर त्यांनी देखील असाच करारनामा लिहुन त्यावर हस्ताक्षर करावे. त्यातील मजकूर असा असावे की, आम्ही हजरत महंमद पैगंबर (स.) यांच्या प्रेषीतत्वावर आणि संदेष्टा असण्यावर श्रध्दा ठेवतो आणि त्यांना एक सच्चा प्रेषीत आणि संदेष्टा मानतो आणि या पुढे नेहमीच त्यांचा आदर आणि सम्मान करत त्यांचा नामोल्लेख करू, जसे की एक श्रध्दावानांसाठी योग्य आहे. आणि जर का आम्ही असे करू शकलो नाही तर एक मोठी रक्कम जी तीन लाखांपेक्षा कमी नसेल अहमदी संप्रदायाला दंड म्हणून अदा करू.

लक्षात असू द्या, की आमचा अहमदी पंथ आता चार लाखांच्या संख्ये पेक्षा अजिबात कमी नाही. म्हणून अशा महान कार्याकरिता तीन लाखांची निधी जमा करणे कठीण नाही. आणि जे लोक अद्याप पर्यंत आमच्या पंथाच्या बाहेर आहेत ते वास्तविक पाहता सर्वच्या सर्व भरकटलेले आणि वैचारिक गोंधळात गुरफटलेले आहेत. ते कोणत्याही अशा नेताच्या अधिपत्याखाली नाहीत, ज्याला ते आपला अनुकरणीय नेता समजतात. म्हणून मी त्यांच्याबाबत काहीही बोलू शकत नाही. आता पर्यंत तर ते लोक मला देखील 'काफिर' आणि 'दज्जाल' ठरवतात (श्रध्दाहीन आणि धोकेबाज), परंतु मी आशा बाळगून आहे, की जेव्हा हिन्दू लोक माझ्याशी असा करारनामा करतील तेव्हा हे लोक सुध्दा काही वावगा व्यवहार करायचा प्रयत्न करणार नाहीत की जेणे करून अशा सुसंस्कृत राष्ट्राच्या ग्रंथांना आणि ऋषींना अपशब्दाने अपमानित करून हजरत महंमद पैगंबर (स.) यांना शिव्या शाप द्यावयाला भाग पडतील. अशा शिव्या शाप तर वास्तविक पाहता त्याच लोकांकडे सोपवल्या जातील जे स्वत: या कृतीला जबाबदार असतील. आणि जसे की असे वर्तन निर्लज्जपणाचे आणि सदाचारच्या

विरूध्द असल्यामुळे मी आशा बाळगतो की, अशा करारनाम्यानंतर ते लोक आपले तोंड उघडणार नाहीत. परंतु या करारनाम्याला दृढता प्राप्त करून देण्यासाठी दोन्ही बाजूचे दहा दहा हजार समंजस लोकांनी त्यावर हस्ताक्षर करणे अनिवार्य असेल.

प्रीय जनहो! सलोख्या सारखी दूसरी कोणतीही गोष्ट नाही. या, आम्ही सर्व जण अशा करारानामाच्या माध्यमातून एकत्र येवू या आणि एक राष्ट्र बनू या. आपण पहात आहोत की आपसातील मतभेदांमुळे किती मोठया प्रमाणात फुट पडलेली आहे आणि देशाला त्यामुळे किती नुकसान होत आहे. या आता हे सुध्दा पारखुन पाहुया की आपसातील स्वीकृती मध्ये किती प्रासादिकता आहे. सलोख्याचा हाच सर्वोत्तम मार्ग आहे अन्यथा दुसऱ्या कोण्यात्याही मार्गाने असेच असेल जसे की एकाद्या गडूला, जो स्वच्छ आणि चमकदार दिसत आहे, त्या स्थितीत सोडून द्यावे आणि त्याच्या दृश्य चमकदारपणारवर संतुष्ट व्हावे. वास्तविक पाहता त्या मध्ये नासलेला आणि दुर्गंधी युक्त पू भरलेला असतो.

मला या ठिकाणी त्या गोष्टीचा उल्लेख करण्याची आवश्यकता नाही की, जो विघटन आणि असंतोष, हिन्दू आणि मुसलमानां मध्ये आजकाल वाढत जात आहे त्याचे कारण धार्मिक मतभेदा पर्यंतच मर्यादित नाही तर त्याच्या पाठीमागे अन्य भौतिक इच्छा आकांक्षा आणि स्वार्थी उद्देश देखील आहेत. उदाहरणार्थ, सुरूवाती पासून हिन्दूंची अशी इच्छा आहे की शासन आणि राज्याच्या व्यवहारा मध्ये त्यांचा अंमल असावा किंवा कमीतकमी राज्य चालवण्यामध्ये त्यांचा सल्ला घेतला जावा. आणि सरकार ने त्यांच्या सर्व तक्रारी लक्षपूर्वक ऐकाव्यात आणि सरकारा मधील मोठ मोठे हुद्दे इंग्रजांप्रमाणे त्यांना देखील मिळावे. मुसलमानांकडून ही चूक झाली की त्यांनी हिन्दूंच्या या प्रयत्नां मध्ये सहभागी न होता त्यांनी असा विचार केला की आम्ही संख्येने कमी आहोत आणि या सर्व प्रयत्नां मुळे जर काही लाभ झाला तर ते फक्त हिन्दूंनाच होईल मुसलमानांना होणार नाही, म्हणून

ते फक्त सहकार्य करण्यापासूनच अलिप्त राहिले नाहीत, तर त्याला विरोध करून हिन्दूंच्या प्रयत्नांमध्ये बाधा निर्माणकर्ते झाले, त्यामुळे वितुष्ट वाढत गेले. मी मान्य करतो की या कारणांनी देखील मूळ शत्रुत्वाला अधिक बळ मिळाले; परंतु हे मी अजिबात मान्य करत नाही की शत्रुत्वाची मूळ कारणे हीच आहेत. आणि मी त्या लोकांशी सहमत होवू शकत नाही जे म्हणतात की हिन्दू आणि मुसलमान मध्ये शत्रुत्व आणि विभाजनाचे कारण धार्मिक विवाद नसून मूळ विवाद राजकीय आहे.

ही गोष्ट प्रत्येक व्यक्ति सहजपणे समजू शकतो की, मुसलमान आपल्या रास्त हक्कांच्या मागण्यांसाठी हिन्दूं बरोबर सामील होण्यास का भीती बाळगतात आणि का आजपर्यंत त्यांच्या काँग्रेस मध्ये सहभागी होण्यास नकार देत आहेत? आणि सरते शेवटी हिन्दूंच्या मतांना रास्त समजून त्यांच्याच पावलावर पाऊल का ठेवत आहेत, परंतु त्यांच्यापासून विलग होवून आणि त्यांच्या विरोधात एक मुस्लिम संघटना स्थापन केली, परंतु त्यांच्या सोबत सहभागी होणे मान्य केले नाही.

लोकहो! त्याचे मूळ कारण वास्तविक पाहता धर्मच आहे आणि त्या शिवाय अन्य काही नाही. जर आज तेच हिन्दू पवित्र कलमा '**ला इलाहा इल्लल्लाहु मुहमदुर्रसूलूल्लाह**' म्हणत जर मुसलमानांना बिलगतील किंवा मुसलमान हिन्दू बनून अग्नि, वायू वगैरेंची उपासना, वेदांच्या आज्ञेप्रमाणे सुरू करतील आणि इस्लामला निरोप देतील, तर मग ज्या समस्यांना ते राजकीय समजतात त्या समस्या एका क्षणात संपुष्टात येतील जणू कधी या समस्या नव्हत्याच.

म्हणून यावरून हे स्पष्ट होते, की सर्व ईर्षा आणि आकसाचे मूळ, वास्तविक पाहता धार्मिक मतभेदच आहेत. हेच धार्मिक मतभेद पुरातन काळापासून चरमसीमे पर्यंत जावून रक्ताचे पाट वाहवत राहिले आहेत. हे मुसलमानांनो! ज्या अर्थी हिन्दू लोक तुम्हाला धार्मिक मतभेदामुळे एक वेगळे राष्ट्र मानतात आणि तुम्ही सुध्दा याच कारणाने अन्य राष्ट्र

समजता, म्हणून जो पर्यंत या कारणाचे निवारण केले जाणार नाही, तो पर्यंत तुमच्यात आणि त्यांच्यात खराखुरा समझोता कसा काय निर्माण होवू शकतो. हो! हे शक्य आहे की दांभिकपणे काही काळासाठी मेल मिलाफ होऊन जाईल, परंतु मनांची स्वच्छता, ज्याला खऱ्या अर्थाने स्वच्छता म्हणायला पाहिजे, जी फक्त अशाच परिस्थिती मध्ये निर्माण होवू शकते जेव्हा तुम्ही लोक वेद आणि वेदांच्या ऋषींना सच्च्या मनाने ईश्वराकडून असल्याचे मान्य कराल. आणि त्याच प्रमाणे हिन्दू लोक देखील आपल्या कृपणतेचा त्याग करून आमच्या पवित्र पैगंबर (स.) यांच्या प्रेषीतत्वाला मान्यता देतील. लक्षात असू द्या आणि स्पष्टपणे लक्षात असू द्या की, तुमच्यात आणि हिन्दू लोकांत खराखुरा सलोखा निर्माण करणारा हा एकच मूलमंत्र आहे. आणि हे एकमेव असे पाणी आहे जे आपसातील घृणेला धूवून स्वच्छ करेल. आणि जर हे दोन्ही विभक्त झालेली राष्ट्रे आपसात एकरूप होण्याचा काळ आला असेल तर परमेश्वर देखील त्यांच्या मनामध्ये ही गोष्ट उघड करेल, जी गोष्ट आमच्या मध्ये उघड केलेली आहे. परंतु या साठी हे देखील आवश्यक आहे की, हिन्दू लोकां बरोबर खऱ्या खुऱ्या सद्भावनेचा व्यवहार करावा. आणि सदाचार व सहिष्णूता आपला स्वभाव बनवावा. आणि अशा कृत्यांपासून स्वत:ला अलिप्त ठेवावे ज्यामुळे त्यांना त्रास होईल. परंतु ही कृत्ये आमच्या धर्मांमध्ये आवश्यकही नसावीत आणि अनिवार्यही नसावीत. म्हणून जर हिन्दू लोक आपल्या सच्च्या दिलाने आमच्या सच्च्या पैगंबर (स) यांना प्रेषीत मानतील आणि त्यांच्यावर श्रध्दा बाळगतील तर हे वितुष्ट, जे गाईच्या संदर्भात आहे, त्याला देखील दूर केले जावे. ज्या गोष्टीला आम्ही वैध मानतो; परंतु आम्ही त्याचा कधीही वापर केला नाही. त्यांच्याशी सद्व्यवहार आणि उपकाराने वागणे आमच्या धर्माच्या इच्छा पत्रातील एक इच्छा आहे, ईश्वराला एकमेवाद्वितीय मानने म्हणून एक आवश्यक आणि उपयुक्त कार्यासाठी एका अनावश्यक गोष्टीचा त्याग करणे ईश्वराच्या शरियतच्या विरूध्द नाही. वैध मानने वेगळी बाब

आहे आणि वापर करणे वेगळी बाब आहे. धर्म हा आहे की, ईश्वराने ज्या गोष्टींना निषिध्द ठरविले आहे त्यांचा त्याग करणे आणि त्याच्या मर्जीच्या मार्गावरून मार्गक्रमण करणे आणि प्रत्येक निर्मितीशी नेकी आणि भलाई करणे आणि सद्भावनेने वागणे आणि जगातील सर्व पवित्र प्रेषीतांना आणि संदेष्टयांना की, जे आपल्या आपल्या काळात ईश्वराकडून प्रकट झाले होते, त्यांना सुधारक मानने आणि त्यांच्यात पक्षपात न करणे आणि प्रत्येक मानवमात्रांची सेवा करणे, हेच आमच्या धर्माचे सार आहे. परंतु जे लोक विनाकारण ईश्वरापासून भयमुक्त होवून आमचे पवित्र पैगंबर (स.) यांच्या प्रती अपशब्दांचा वापर करतात आणि त्यांच्यावर अपवित्र आरोप लावतात आणि त्यांना शिव्याशाप देण्यापासून परावृत्त होत नाहीत, त्यांच्याशी आम्ही कसा काय समझोता करू शकतो. मी खरच सांगतो की, आम्ही ओसाळ जमिनीतील सापांशी आणि जंगलातील लांडगण्यांशी देखील समझोता करू शकतो, परंतु त्या लोकांशी आम्ही समझोता करू शकत नाही जे आमच्या प्रीय पैगंबर, जे आम्हाला आमच्या प्राणाहूनही आणि आमच्या माता पिताहूनही अधिक प्रीय आहेत, जर त्यांच्यावर अपवित्र हल्ले करत असतील. परमेश्वर आम्हाला इस्लाम वरच मृत्यु देवो. आम्ही असे कार्य करू इच्छित नाही ज्यामुळे आमची श्रध्दा नष्ट होईल.

मी या वेळी कोणत्याही विशिष्ट जातीला अकारण धिक्कारू इच्छित नाही आणि कोणाचे मन देखील दुखावू इच्छित नाही उलट अतिशय दु:खाने आणि हृदय पिळवटून मला हे म्हणायचे आहे की, इस्लाम तो पवित्र आणि शांतीपूर्वक धर्म आहे, ज्याने कोणत्याही अन्य राष्ट्राच्या नेत्यावर हल्ला केलेला नाही. आणि पवित्र कुरआन असा आदरणीय ग्रंथ आहे ज्याने राष्ट्रां मध्ये सलोखा निर्माण करण्याची पायाभरणी केली आहे आणि प्रत्येक राष्ट्राच्या प्रेषीताला मान्यता दिलेली आहे. आणि जगामध्ये हा बहुमान फक्त पवित्र कुराअनालाच प्राप्त आहे ज्याने जगाच्या प्रती आम्हाला ही शिकवण दिली की,

لَا نُفَرِّقُ بَيْنَ اَحَدٍ مِّنْهُمْ وَنَحْنُ لَهٗ مُسْلِمُوْنَ

(आले इम्रान- ८५)

अर्थात- हे मुसलमानांनो असे म्हणा की, आम्ही सर्व प्रेषीतांवर श्रध्दा ठेवतो आणि त्यांच्या मध्ये पक्षपात करत नाहीत, की काहींना मान्यता देतो आणि काहीं ना रद्द करतो. जर असे शांती प्रीय आणि सलोखापूर्ण अन्य कोणते ईश्वरीय ग्रंथ असेल तर त्याचे नाव लिहून सांगा. पवित्र कुरआनाने ईश्वराच्या सार्वत्रिक कृपेला कोणत्याही विशिष्ट अशा घराण्यापर्यंत सीमित केलेले नाही. इस्त्राईली घराण्याचे जेवढे प्रेषीत होते, मग ते याकूब असोत, इस्हाक असोत, की मुसा असो की दावूद असोत की येशू असोत, सर्व प्रेषीतांना मान्यता दिली आहे. आणि सर्व राष्ट्रांच्या प्रेषीतांना मग ते भारतात होवून गेले असोत किंवा रशिया मध्ये होवून गेलेले असोत, कधीही त्यांना लबाड आणि खोटे ठरविलेले नाही; उलट स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रत्येक राष्ट्रा मध्ये आणि प्रत्येक वस्ती मध्ये प्रेषीत होवून गेलेले आहेत आणि प्रत्येक राष्ट्रासाठी सलोख्याची पायाभरणी केली आहे; परंतु सखेद म्हणावे लागते की, या शांती प्रीय प्रेषीताला प्रत्येक राष्ट्र शिव्य शाप देतो आणि त्याच्याकडे अतिशय तिरस्काराने पाहतो. हे प्रीय देश बांधवांनो! हे निवेदन मी तुमच्या सेवेत या साठी सादर केलेले नाही की, तुम्हाला त्रास व्हावा किंवा आपले मन दुखवावे, उलट मी अतिशय सद्भावनेने हे निवेदन करू इच्छितो की ज्या राष्ट्रांनी हा मार्ग अवलंबिला आहे आणि गैर वाजवी पणे आपल्या धार्मिक श्रध्देचा भाग बनविला आहे की, अन्य राष्ट्रांच्या प्रेषीतांच्या प्रती अपशब्द आणि शिव्या शाप देऊन त्यांचा नामोल्लेख करावा ते फक्त अवाजवी हस्तक्षेपामुळे की, ज्या बद्दल त्याच्याकडे कुठलाही पुरावा नाही, ईश्वराचे अपराधी आहेत. तसेच ते मानवजाती मध्ये शत्रुत्व आणि विभाजन करण्याच्या बीजारोपणाचे अपराधी

देखील आहेत. तुम्ही आपल्या हृदयावर हात ठेवून मला या गोष्टीचे उत्तर द्या की, जर कोणी व्यक्ति एखाद्याच्या बापाला शिवी देत असेल किंवा त्याच्या आई वर कोणताही आळ घेत असेल तर तो काय आपल्या पिताच्या इभ्रतीवर हल्ला करत नाही आणि ती व्यक्ति ज्याला अशा प्रकारे शिवीगाळ केली आहे त्याने प्रतिउत्तर म्हणून अशीच शिवी गाळ केली तर हे म्हणणे चूकीचे ठरेल का की प्रतिउत्तर दाखल दिलेली शिवीगाळीसाठी वास्तविक पाहता तीच व्यक्ति कारणीभूत आहे ज्याने शिवीगाळ करण्यात सुरूवात केली, अशा स्थिती मध्ये आपल्या आई बापाच्या इभ्रतीचा तो स्वत:च शत्रु ठरतो.

परमेश्वराने पवित्र कुरआना मध्ये आम्हाला इतका आदर आणि सदाचार शिकविला आहे की, तो म्हणतो

لَا تَسُبُّوا الَّذِيْنَ يَدْعُوْنَ مِنْ دُوْنِ اللهِ فَيَسُبُّوا اللهَ عَدْوًا بِغَيْرِ عِلْمٍ
(अल् अन् आम-१०९)

अर्थात तुम्ही मूर्ति पूजकांच्या मूर्तिंना शिवीगाळ करू नका; कारण मग ते तुमच्या ईश्वराला देखील शिवीगाळ करतील कारण ते त्या ईश्वराला ओळखत नाही. आता हेच पहा की जरी ईश्वराच्या शिकवणूकीनुसार मूर्तिंची काहीच प्रतिष्ठा नाही. तरी पण ईश्वराने मुसलमानांना ही सद्भावना शिकविली आहे की, मूर्तिंना देखील अपशब्द वापरू नका आणि आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवा आणि फक्त सभ्य भाषेत समजावून सांगा. असे होवू नये की, ते लोक भडकले जावून ईश्वराला शिव्याशाप देवू लागतील. आणि त्या शिव्याशापाला तुम्हीच कारणीभूत ठरसाल. अशा स्थितीत ते लोक कसे आहेत, जे इस्लामच्या या प्रतिष्ठीत पवित्र पैगंबराला शिव्या देतात आणि त्यांच्यासाठी अपशब्दांचा वापर करतात आणि रानटीपणे त्यांच्या अब्रु वर आणि चारित्र्यावर हल्ले करतात. तो महान प्रेषीत ज्याचे नाव घेतल्याने मुसलमानांचे मोठ मोठे बादशाह सिंहासनावरून खाली उतरतात. आणि त्यांच्या आदेशांपुढे नतमस्तक होतात आणि स्वत:ला त्याचे शुद्र

दास मानतात, काय ही प्रतिष्ठा ईश्वरा कडून नाही. ईश्वरदत्त प्रतिष्ठेच्या विरूध्द अपमान करणे त्याच लोकांचे कार्य असू शकते जे ईश्वराशी युध्द करू इच्छितात. हजरत महंमद पैगंबर (स.) ईश्वराचे असे महान प्रेषीत आहेत ज्यांच्या समर्थनात आणि प्रतिष्ठेला प्रकट करण्यासाठी ईश्वराने जगाला मोठ मोठे चमत्कार दाखविले. काय हे परमेश्वराचे कार्य नव्हे की त्याने २० कोटी लोकांना महंमदाच्या दारी नतमस्तक व्हायला भाग पाडले. जरी प्रत्येक प्रेषीत आपल्या प्रेषीततत्वाच्या सत्यतेचे काही ना काही पुरावे सोबत बाळगत होता; परंतु ज्या प्रमाणात महंमद पैगंबरांच्या प्रेषीततत्वाचे पुरावे आज पर्यंत प्रकट होत आहेत त्याचे उदाहरण अन्य कोणत्याही प्रेषीता मध्ये आढळून येत नाही.

तुम्ही लोक ही गोष्ट समजू शकत नाही की, जेव्हा पृथ्वी पाप आणि अपराधाने मलीन होवून जाते आणि परमेश्वराच्या तराजू मध्ये दुष्कर्मे, दुराचार आणि बेदरकारपणा, पुण्य कर्मा पेक्षा अधिक होत जातात तेव्हा परमेश्वराची कृपा अशा वेळेस आपल्या एखाद्या भक्ताला पाठवून पृथ्वी वरून हे सर्व उपद्रव नष्ट करण्यासाठी कार्यरत होते. जसे की एखाद्या आजाराला नष्ट करण्यसाठी वैद्याची आवश्यकता असते. तुम्ही लोक ही गोष्ट समजण्यासाठी सर्वाधिक पात्र आहात कारण आपल्या म्हणण्यानुसार वेद अशा काळात अवतरीत झाले नाही ज्या वेळी पृथ्वीवर पापाचे वादळ उठले होते; परंतु ते अशा वेळी पृथ्वीवर अवतरले जेव्हा पृथ्वीवर पापांचा पूर आलेला नव्हता. मग काय ही गोष्ट तुमच्या लक्षात येत नाही का की, ज्या वेळी जगाच्या पाठीवर प्रत्येक देशा मध्ये पापांचा महापूर आलेला असतो त्यावेळी ईश्वराचा एखादा प्रेषीत प्रकट होणार नाही?

मी आशा बाळगतो की, आपणाला ही ऐतिहासिक घटना ज्ञात असेल की, आमचे पवित्र प्रेषीत हज़रत महंमद (स.) ज्यावेळी प्रेषीत पदावर आरूढ झाले होते, तो काळ अशा अंधकाराचा काळ होता की जगाच्या लोकसमूहा मध्ये सर्व प्रकारचे दुराचार आणि दुष्कर्म मोठया

प्रमाणात पसरलेले होते. आणि जसे की, पंडित दयानंद आपला ग्रंथ 'सत्यार्थ प्रकाश' मध्ये लिहतात की, त्या काळा मध्ये या आर्यावर्त देशात देखील मूर्ति पूजेने ईश्भक्तिची जागा घेतली होती आणि वैदिक धर्मात मोठा बिघाड निर्माण झाला होता.

अशाच प्रकारे 'मीझानुल हक्क' चे लेखक पादरी फिंडल साहेब, जे ख्रिस्ती धर्माचे मोठे समर्थक आणि युरोपियन व्यक्ति आहेत, त्यांनी आपल्या ग्रंथ 'मीझानुल हक्क' मध्ये लिहले आहे की, ज्यावेळी पवित्र पैगंबर महंमद (स.) प्रकट झाले त्यावेळी अन्य कोणत्याही समाजापेक्षा ख्रिस्ती समाजा मध्ये सर्वाधिक बिगाड निर्माण झाला होता. आणि त्यांची दुष्कर्मे ख्रिस्ती धर्मासाठी कलंक आणि लज्जेचा विषय झाले होते. आणि प्रत्यक्ष पवित्र कुरआना मध्ये देखील आपल्या अवतरणाची गरज खालील आयती मध्ये नमूद केलेला आहे:

ظَهَرَ الْفَسَادُ فِى الْبَرِّ وَالْبَحْرِ

(अर् रूम-४२)

अर्थात भूमी आणि समुद्र दोन्ही बिगडले होते. या आयतीचा अर्थ असा होतो की प्रत्येक समाज, मग तो रानटी अवस्थेतील असेल किंवा स्वत:ला बुध्दीमान समजत असेल, कोणीही दुराचार मुक्त नव्हते.

आता जेव्हा सर्वच साक्षी पुराव्यापासून सिध्द होते की प्रेषीत महंमद पैगंबर (स.) यांच्या काळातील लोक, मग ते पौर्वात्य असोत की पाश्चिमात्य किंवा आर्यावर्ताचे राहणारे असोत की अरबस्तानातल्या वाळवंटातील लोक असोत किंवा मग वेगवेगळया बेटांवर राहणारे लोक असोत, सगळेच बिगडले होते आणि एकही व्यक्ति अशी नव्हती ज्याचा आपल्या परमेश्वराशी स्पष्ट संपर्क होता. आणि दुराचारांनी या पृथ्वीला अपवित्र केले होते मग काय एका बुध्दीवान माणसास हे समजून येत नाही का की, हीच ती वेळ होती आणि हाच तो काळ होता ज्याच्या संदर्भात मानवी बुध्दी अशी अपेक्षा करते की अशा अंधकारमय काळा

मध्ये नक्कीच कोणी तरी महान प्रेषीत यायला हवा होता.

आता हा प्रश्न शिल्लक राहतो की, या प्रेषीताने जगात येऊन काय सुधारणा केली. या प्रश्नाचे उत्तर जसे एक मुसलमान हजरत महंमद (स.) यांनी घडवून आणलेल्या सुधारणे बद्दल सांगू शकतो तसे सप्रमाण उत्तर कोणी ख्रिस्तीही देवू शकत नाही, कोणी यहुदीही देवू शकत नाही आणि कोणी आर्याही देवू शकत नाही. ही गोष्ट मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. प्रेषीत हजरत महंमद (स.) यांचा पहिला उद्देश अरब राष्ट्रात सुधारणा करणे हा होता. आणि त्या काळात अरब प्रदेश अशा अवस्थेत होता की त्यांना मानव म्हणून संबोधने देखील कठीण होते. असे कोणते दुष्कर्म होते जे त्यांच्यात आढळून येत नव्हते. आणि असा कोणता बहुईश्वरवाद नव्हता जो त्यांच्यात रूढ नव्हता. चोरी करणे, डाका घालणे हे त्यांचे कार्य होते आणि विनाकारण रक्तपात करणे त्यांच्या नजरेत इतकी क्षुल्लक बाब होती की जणू पाया खाली मुंगी चिरडली जावी. अनाथ मुलांचा वध करून त्यांची संपत्ती बळकावत होते. मुलींना जीवंतपणीत मातीत दफन करत होते. व्यभिचार करून त्यावर गर्व करत होते आणि उघडपणे आपल्या स्तवन गीतांमधून या दुष्कर्मांचा गौरवाने उल्लेख करत होते. मद्यपान या समाजात मोठया प्रमाणात केले जात होते. एक देखील घर दारू पासून मुक्त नव्हते. जुगार खेळण्या मध्ये सर्व देशांच्या पुढे होते. श्वापदानां देखील लाज वाटेल आणि साप तथा लांडगयांना देखील शर्म वाटेल अशी अवस्था होती.

मग जेव्हा आमचे पवित्र प्रेषीत (स) त्यांच्या प्रबोधनासाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी आपल्या आत्मिक शक्तिच्या बळावर त्यांच्या हृदयात परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न सुरू केला आणि फारच थोडया कालावधीत त्यांच्या मध्ये असे परिवर्तन घडवून आणले की ते पशु पासून मानव बनले आणि मग मानवातून सुसंस्कृत मानव बनले आणि सुसंस्कृत मानवातून ते ईश्प्रवण मानव झाले आणि शेवटी ते ईश्वराच्या प्रेमा मध्ये असे विलीन

झाले की जणू ते निर्जीव अवयवा प्रमाणे सर्व प्रकारचे कष्ट सहन करण्यास तत्पर झाले. त्यांना वेगवेगळया प्रकारे कष्टदायक स्थितीतून जावे लागले, अतिशय निष्ठूरपणे त्यांच्यावर फटकेबाजी केली गेली आणि तप्त वाळूवर नग्न शरीराने झोपविले गेले, त्यांना अटक केली गेली, अन्न आणि पाण्या वाचून त्यांना मरणासन्न अवस्थेपर्यंत पोहचविले गेले; परंतु त्यांनी प्रत्येक कष्ट सहन करून आपले पाऊल पुढेच टाकले आणि त्यांच्यातील अनेक असे होते ज्यांच्या मुलांना त्यांच्या समोर ठार केले गेले. त्यांच्यात अनेक जण असे होते ज्यांना त्यांच्या मुलांसमोर फासीवर चढवले गेले आणि ज्या स्थितप्रज्ञपणे त्यांनी ईश्वराच्या मार्गा मध्ये आपले प्राणार्पण केले त्याची कल्पना करून देखील कंठ दाटून येतो. त्यांच्या हृदयावर परमेश्वराचा प्रभाव आणि त्यांच्या प्रेषीताच्या प्रबोधनाचा प्रभाव नव्हता तर मग ती कोणती गोष्ट होती ज्यामुळे ते इस्लामकडे आकर्षित झाले. आणि एका अलौकिक परिवर्तनामुळे ते एका अशा व्यक्तिच्या चौकटीवर नतमस्तक होण्याकडे रूजू झाले जो एक दीन-दुबळा आणि निष्कांचन अवस्थेत मक्केच्या गल्लीबोळातून एकटा फिरत होता. शेवटी कोणती तरी आध्यात्मिक शक्तीच असेल, जी त्यांना पाश्विक अवस्थेतून वर उंचावून अत्योच्च स्थानावर घेवून गेली. सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे त्यांच्यातील बहुतेक जण श्रध्दाहीन अवस्थेत असताना प्रेषीत महंमद पैगंबरांचे हाडवैरी आणि त्यांचे रक्तपीण्यासाठी तहाणलेले होते. म्हणून या पेक्षा दुसरा मोठा चमत्कार असेल असे मी समजू शकत नाही की, कशाप्रकारे एका गरीब, नादार, लाचार आणि एकट्या मनुष्याने त्यांच्या हृदयाना सर्व प्रकारच्या द्वेष भावनेतून मुक्त करून स्वत:कडे आकर्षित करून घेतले की, ज्यामुळे ते उंचीवस्त्र प्रावरणे फेकून गोणपाटाची वस्त्रे धारण करून त्यांच्या सेवेत हजर झाले.

काही नासमज लोक इस्लामवर जिहाद चा आरोप लावतात आणि असे म्हणतात की, हे सर्व लोक बळजबरीने तलवारीच्या धाकाने मुसलमान बनवले गेले होते. अतिशय खेदपूर्वक म्हणावे लागेल की, ते अन्याय आणि

सत्याचा अपलाप करण्यात सर्व मर्यादा भंग करून पुढे गेले आहेत. हे मोठे दुर्दैव आहे की, ते जाणूनबुजून सत्य घटनांपासून तोंड फिरवतात. आमचे प्रेषीत महंमद (स) अरब प्रदेशामध्ये एक बादशाह म्हणून अवतरीत झाले नव्हते, जेणे करून अशी समजूत करून घेतली जावी की ते बादशाही रूबाब आणि वैभव संपन्न असल्यामुळे लोक आपले प्राण वाचवण्यासाठी त्यांच्या पुढे शरणागत झाले.

म्हणून प्रश्न असा उपस्थित होतो की, आपल्या गरीबी, नादारी आणि एकटेपणाच्या अवस्थेत परमेश्वराचे एकत्व आणि आपल्या प्रेषीतत्वाच्या घोषणेची सुरूवात केली होती त्यावेळी कोणत्या तलवारीच्या भयामुळे लोक त्यांचे अनुयायी झाले. आणि जर त्यांचे अनुयायी झाले नव्हते तर मग बळजबरी करण्यासाठी कोणत्या बादशाह कडून लष्कर मागविले गेले होते. आणि मदत मागितली गेली होती.

हे सत्यान्वेषी लोकहो! खात्री बाळगा की, या सर्व गोष्टी त्या लोकांनी पसरवलेले भ्रम आणि अफवाह आहेत, जे इस्लाम चे कट्टर शत्रु आहेत. इतिहासाकडे पहा पवित्र पैगंबर महंमद (स.) तोच एक अनाथ मुलगा होता ज्याचे पिता त्याच्या जन्माच्या काहीं दिवसा नंतर मृत्यु पावले होते आणि त्यांची माता फक्त काहीं महिन्या नंतर मरण पावली होती. अशा अवस्थेत तो बालक ज्याला परमेश्वराच्या कृपेची साथ होती, कुठल्याही आधाराविना परमेश्वराच्या कृपा छत्राखाली त्याचे संगोपन झाले. या कष्टदायक स्थिती मध्ये आणि अनाथ अवस्थे मध्ये त्यांनी काहीं लोकांच्या शेळयाही राखल्या. ईश्वरा शिवाय अन्य कोणीही त्याचा पोशिंदा नव्हता. आणि पंचवीस वर्षाच्या वया पर्यंत पोहचल्यानंतर देखील कोणत्याही चूलत्याने त्यांना आपली मुलगी दिली नाही. कारण वरकरणी पाहिल्यास ते घर गृहस्ती भागवण्यास पात्र नव्हते. आणि फक्त एक निरक्षर होते. कुठलाही उद्योग धंदा करण्याची पात्रता त्यांच्यात नव्हती. मग ज्या वेळी ते चाळीस वर्षाच्या वयापर्यंत पोहचले तेव्हा अचानक त्यांचे हृदय

परमेश्वराकडे आकर्षिले गेले. मक्केपासून काही मैलांच्या अंतरावर एक गुहा आहे जिचे नाव 'हिरा' आहे, ते एकटेच तेथे जात आणि गुहे मध्ये एकांतात बसून आपल्या परमेश्वराचे स्मरण करत. एके दिवशी त्याच गुहे मध्ये ते एकांतात उपासना करत होते त्यावेळी त्यांना ईश्वराचा साक्षात्कार झाला आणि त्यांना आदेश दिला गेला की, या जगाने ईश्वराचा मार्ग त्यागला आहे आणि पृथ्वी पापामुळे लिप्त झाली आहे, म्हणून मी तुला आपला संदेष्टा नियुक्त करतो, आता तू लोकांना सावधान कर की, परमेश्वराचा प्रकोप होण्यापूर्वी त्यांनी परमेश्वराकडे रूजू व्हावे. हा आदेश ऐकल्यानंतर ते खूप घाबरले की, मी एक निरक्षर मनुष्य आहे आणि मी लेखन वाचन सुध्दा जाणत नाही; तेव्हा परमेश्वराने त्यांच्या हृदया मध्ये सर्व आध्यात्मिक ज्ञान भरून टाकले आणि त्यांच्या हृदयाला प्रकाशमान केले. त्यांच्या या पवित्र आत्मबला मुळे गरीब आणि लाचार लोक त्यांच्या अनुयायी संघात दाखल होवू लागले आणि जे मोठ-मोठे लोक होते त्यांनी त्यांच्याशी शत्रुत्व करण्याचे चंग बांधले. आणि त्यापुढे जाऊन सरते शेवटी त्यांना ठार करण्याचे ठरविले. अनेक पुरूष आणि स्त्रीया अनुयायी अतिशय निष्ठूरपणे ठार मारले गेले आणि शेवटी हजरत महंमद पैगंबर (स) यांना ठार मारण्याचा कट रचला गेला आणि त्यांच्या घराला वेढा देण्यात आला. परंतु ज्याचे रक्षण परमेश्वर करतो त्याला कोण मारू शकतो! परमेश्वराने त्यांना संदेश दिला की, तुम्ही हे शहर सोडून निघून जा आणि मी प्रत्येक पावलावर तुमच्या सोबत आहे. म्हणून ते मक्का शहर सोडून अबु बकर यांना सोबत घेऊन बाहेर पडले आणि तीन रात्री पर्यंत 'सौर' नावाच्या गुहे मध्ये लपवून राहिले. शत्रुने पाठलाग केला आणि एका शोधकाला सोबत घेवून त्या गुहे पर्यंत पोहचले. त्या शोधकाने गुहे पर्यंत पावलांच्या खुणा दाखवून दिल्या आणि म्हटले की त्यांना या गुहेत शोधा. या पुढे त्यांच्या पावलांच्या खुणा नाहीत आणि जर तो या पुढे गेला असेल तर मग तो आकाशातच चढून जावू शकतो. परंतु परमेश्वराच्या चमत्कृतीपूर्ण

शक्तीला कोण सीमाबध्द करू शकते? परमेश्वराच्या कृपेने एका रात्रीतच कोळ्याने त्या गुहेच्या तोंडावर जाळे निर्माण करून त्या गुहेचे तोंड बंद करून टाकले आणि एका कबूतरीने तेथे घरटे बांधून त्यात अंडी दिली. आणि जेव्हा शोधकाने लोकांना गुहे मध्ये प्रवेश करण्यास सांगितले तेव्हा एक वयोवृध्द माणूस म्हणाला की, हा शोधक वेडा झाला आहे मी हे कोळीष्टक या गुहेच्या तोंडावर तेव्हापासून पाहत आलो आहे जेव्हा महंमद चा जन्म देखील झाला नव्हता. त्याची ही गोष्ट ऐकून सर्व लोक तेथून निघून गेले आणि त्या गुहे कडे दुलर्क्ष केले.

त्या नंतर हजरत महंमद गुप्तपणे मदीनेला पोहचले आणि मदीनेतील बहुसंख्य लोकांनी त्यांचा स्वीकार केला. त्यामुळे मक्का वासी खूपच भडकले आणि खंत व्यक्त करू लागले की, आमचे सावज आमच्या हातातून निष्टून गेले आहे आणि मग तेथून रात्रंदिवस कारस्थान रचू लागले की कशा प्रकारे हजरत महंमद (स) यांना ठार मारावे. आणि जे थोडे फार लोक मक्कां वासीयांपैकी प्रेषीतांचे अनुयायी झाले होते ते देखील मक्का सोडून अन्य प्रदेशाकडे स्थलांतरित झाले. काहींनी हबशाच्या राजाकडे आश्रय घेतला आणि काहीं मक्केतच राहिले कारण त्यांच्याकडे प्रवास करण्यासाठी आवश्यक गोष्टींचा अभाव होता. त्यांना खूप त्रास दिला गेला. पवित्र कुरआना मध्ये त्यांचा उल्लेख आढळतो की, ते कशा प्रकारे रात्रंदिवस मदतीसाठी धावा करत होते.

आणि जेव्हा मक्केतील श्रध्दाहीन कुरेशांचा अत्याचार मर्यादेच्या पलीकडे वाढत गेला आणि जेव्हा त्यांनी गरीब महिला आणि बालकांना देखील ठार मारण्याला सुरूवात केली, काही महिलांना अशा निर्दयपणे ठार केले की त्यांचे दोन्ही पाय दोरखंडाने दोन उंटाना बांधून त्या उंटाना विरूध्द दिशाकडे पळवळण्यात आले; अशा प्रकारे त्या महिला दोन भागात चिरल्या जावून मरण पावल्या. ज्या वेळी निर्दय श्रध्दाहीनांचा अत्याचार या सीमेपर्यंत पोहचला तेव्हा परमेश्वराने, जो आपल्या भक्तां प्रती दयाळू

आहे, आपल्या प्रेषीताला संदेश दिला की, अत्याचार पिडीत लोकांची फिर्याद मजपर्यंत पोहचली आहे. आज पासून मी तुम्हाला अनुज्ञा देतो की तुम्ही सुध्दा त्यांचा प्रतिकार करा आणि लक्षात ठेवा की, जे लोक निष्पाप लोकांवर तलवार उगारतात ते तलवारीनेच नष्ट केले जातात. म्हणून तुम्ही कुठल्याही प्रकारे मर्यादा भंग करू नये कारण परमेश्वर मर्यादा भंग करण्याला पसंत करत नाही.

ही इस्लामी जिहाद ची वस्तूस्थिती आहे जिच्या बद्दल अतिशय अन्याय पूर्वक दुष्टपणाने त्याचे वर्णन करण्यात येत असते. निश्चितच परमेश्वर कृपाळू आहे; परंतु जेव्हा एखादे राष्ट्र उपद्रव करण्यामध्ये मर्यादे पलीकडे जातो तेव्हा तो अत्याचारी लोकांना शिक्षा दिल्या वाचून राहत नाही आणि स्वतःच त्यांच्या विनाशाचे निमित्त तयार करतो. मला माहित नाही की आमच्या विरोधकांनी कोठून आणि कोणाकडून ऐकले आहे की, इस्लाम चा प्रसार तलवारीच्या बळावर झाला आहे. परमेश्वर तर पवित्र कुरआना मध्ये म्हणतो,

لَا اِكْرَاهَ فِى الدِّيْنِ

(अल् बक़राह-२५७)

अर्थात धर्माच्या बाबतीत बळजबरी नाही. मग कोणी बळजबरी चा आदेश दिला आणि बळजबरी करण्याचे कोणते साधन त्यांना प्राप्त होते. आणि जे लोक बळजबरीने मुसलमान बनविले जातात त्यांच्या मध्ये एवढी प्रचंड निष्ठा आणि श्रध्दा कोठून येते, की कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता दोन तीनशे लोक हजारो लोकांचा प्रतिकार करण्यासाठी तयार होतात आणि जेव्हा त्यांची संख्या हजारोत पोहचते तेव्हा ते लाखात संख्या असलेल्या शत्रुला पराभूत करतात. आणि धर्माला शत्रुच्या हल्ल्या पासून सुरक्षित ठेवण्यासाठी शेळया मेढरां प्रमाणे कापून काढले जाण्यास सिध्द होतात आणि इस्लामच्या सत्यतेवर आपल्या रक्ताची मोहर लावतात. परमेश्वराच्या एकत्वाच्या प्रचारासाठी अशा प्रकारे आसक्त होवून संन्यस्त

वृत्तीने सर्व प्रकारचे कष्ट उपसून अफ्रिकेच्या वाळवंटा पर्यंत पोहचतात आणि त्या प्रदेशात इस्लाम चा प्रसार करतात आणि सर्व प्रकारचे कष्ट सोसून चीन पर्यंत जातात आणि युध्दाद्वारे नाही तर आपल्या सन्यस्त वृत्तीने सेवा भावीपणे त्या देशात इस्लाम चा संदेश पोहचवितात. परिणामस्वरूप त्यांच्या या प्रासादिक प्रवचना मुळे कोटयावधी लोक पृथ्वी तळावर इस्लाम धर्माचे अनुयायी होतात. आणि मग गोणपाटधारी सन्यासी च्या स्वरूपात भारतात येऊन आर्यवर्ताच्या अनेक भागात इस्लाम चा संदेश पोहचवतात, तसेच युरोप च्या सरहद्दीपर्यंत जावून '**ला इलाहा इल्लल्लाहु**', अल्लाह शिवाय कोणीच उपासनेस पात्र नाही, हा संदेश पोहचवितात. तुम्ही प्रामाणिकपणे सांगा की, हे कार्य असे लोक करू शकतात का ज्यांना बळजबरीने मुसलमान बनवले गेले असेल जे अंत:करणातून श्रध्दाहीन आणि फक्त तोंड देखले पणे श्रध्दावान असतात.

हे शक्यच नाही. हे कार्य फक्त तेच लोक करू शकतात ज्यांची हृदय श्रध्देने प्रकाशमान झालेली असतात आणि ज्यांच्या हृदयात फक्त परमेश्वराचाच वास असतो.

आम्ही पुन्हा एकदा मूळ विषयाकडे वळून इस्लामची शिकवण काय आहे ते सांगू इच्छितो, स्पष्ट असावे की इस्लामचा सर्वात मोठा उद्देश परमेश्वराचे एकत्व आणि प्रभुत्व पृथ्वीवर कायम करणे आणि अनेकेश्वरवादाचा पूर्णपणे नायनाट करणे, हे आहे. तसेच वेगवेगळया संप्रदायाना एका '**कलमा**' च्या (धर्मसुत्रा) आधारे एक समुदाय बनवून त्यांच्यात एकात्मता निर्माण करणे आहे. पूर्वीचे जे धर्म या जगात आहेत आणि जेवढे म्हणून प्रेषीत आणि संदेष्टे जगात होवून गेले आहेत त्यांचे कार्यक्षेत्र फक्त आपल्या समाजापर्यंत मर्यादित होते. त्यांनी काहीं नैतिक शिकवण जरी दिली असेल तरी त्या नैतिक शिकवणीचा उद्देश या पलीकडे नव्हता की, त्यांचा स्वत:चा समाजच या नीतीमत्तेमुळे लाभान्वित व्हावा. जसे की, येशू ख्रिस्ताने स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, माझी शिकवण

फक्त बनी इस्त्राईल पर्यंत सीमीत आहे आणि जेव्हा एका स्त्रीने, जी इस्त्राईली घराण्यात सामील नव्हती, त्यांना अतिशय आर्जवपूर्वक उपदेश मागितला तेव्हा त्यांनी नकार दिला आणि जेव्हा परत ती गरीब स्त्री स्वत:ला कुत्र्या समान समजून उपदेश प्राप्त करण्याच्या हेतूने त्यांच्या सेवेत रूजू झाली, तेव्हा तिला उत्तर दिले गेले की मी फक्त इस्त्राईलच्या मेंढरां प्रती उपदेशक म्हणून आलेलो आहे. मग ती स्त्री चूपचाप निघून गेली. परंतु आमच्यां पवित्र प्रेषीतांनी कुठेच असे म्हटले नाही की, मी फक्त अरब देशा साठीच आलो आहे. या उलट पवित्र कुरआनात म्हटले आहे की:

قُلْ يَاأَيُّهَا النَّاسُ إِنِّ رَسُوْلُ اللهِ إِلَيْكُمْ جَمِيْعًا

(अल् आराफ़-१५८)

अर्थात लोकांना असे म्हण की, मी संपूर्ण जगासाठी संदेष्टा म्हणून अवतरीत झालो आहे. परंतु लक्षात असू द्या की येशू चा त्या महिलेला स्पष्ट शब्दात उत्तर देणे, हा त्यांचा कुठलाही अपराध नसून, तो पर्यंत सार्वत्रीक उपदेशाची वेळ आलेली नव्हती आणि परमेश्वराने येशू ख्रिस्ताना असा आदेश दिला होता, की तुम्ही बनी इस्त्राईलसाठी उपदेशक नियुक्त झाले आहात; इतरांशी तुमचा काहीच संबंध नाही. म्हणून मी जसे या पूर्वी म्हटले आहे की, येशू ख्रिस्तांची नैतिक शिकवण ही फक्त यहुदींसाठी मर्यादित होती. खरी गोष्ट अशी होती की 'तोराह' मध्ये असे आदेश होते की, दाताच्या बदल्यात दात, डोळयाच्या बदलयात डोळा आणि नाकाच्या बदल्यात नाक, ही अशी शिकवण फक्त या उद्देशाने देण्यात आली होती की जेणे करून यहुदीं मध्ये न्याय प्रीयता प्रस्थापित व्हावी आणि अमर्याद अत्याचार नष्ट करण्याची वृत्ती नष्ट व्हावी. कारण चारशे वर्षांपर्यंत गुलामीत खितपत पडल्यामुळे त्यांच्या वृत्तीमध्ये निष्ठूरपणा आणि निचपणाचे गुण निर्माण झाले होते. म्हणून परमेश्वराने मोठया युक्तीने त्यांच्यामध्ये, जशी बदल्याची भावना आणि सूड घेण्याची वृत्ती अतिशय निष्ठूरपणा पर्यंत निर्माण झाली होती, ती वृत्ती नष्ट करून त्यांना अतिशय

कठोर अशी नैतिक शिकवण दिली जावी. म्हणून जी नैतिक शिकवण बाईबल मध्ये आहे ती फकत यहुदीं साठी असून जगातील इतर कोणत्याही समुदायाप्रती येशू ख्रिस्तांना काही देणे-घेणे नव्हते.

परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, या शिकवणी मध्ये, जी येशू ख्रिस्तांनी सादर केली फक्त एवढाच दोष नाही की ती सर्व जगाच्या प्रबोधनावर आधारित नाही; परंतु हा देखील दोष आहे की, जसे तोराह मध्ये निष्ठूरतेने सूड घेण्याची शिकवण अतिरेकाकडे झूकलेली आहे, तसेच बाईबल मध्ये क्षमादान आणि सहानुभूतीची शिकवण अतिशय सौम्यतेकडे झुकलेली आहे. या दोन्ही ग्रंथांनी मानवी वृक्षाच्या सर्वच शाखांचा अजिबात विचार केला नाही, तर या वृक्षाच्या एका शाखेला तोराह धारण करते, तर दुसरी शाखा बाईबलच्या हातात आहे. या दोन्ही शिकवणूकी समन्यवयाच्या भूमिकेपासून घसरल्या आहेत. कारण ज्या प्रमाणे प्रत्येक वेळी आणि प्रत्येक प्रसंगी बदला घेणे आणि शिक्षा देणे नेहमीच उपयुक्त नसते; तसेच प्रत्येक वेळी आणि प्रत्येक प्रसंगी क्षमा करणे आणि सहानुभूती दाखवणे मानवाच्या प्रबोधनाच्या उपायांच्या विरूध्द असते. म्हणूनच पवित्र कुरआना मध्ये या दोन्ही शिकवणींना रद्द ठरवून असे म्हटले आहे की:

جَزَآؤُ سَيِّئَةٍ سَيِّئَةٌ مِّثْلُهَا فَمَنْ عَفَا وَاَصْلَحَ فَاَجْرُهٗ عَلَى اللهِ

(अश् शूरा-४१)

अर्थात- दुष्कृत्याचा बदला तेवढयाच प्रमाणात शिक्षा देवून घेण्यात यावा - जशी तोराह ची शिकवण आहे - परंतु जी व्यक्ति क्षमा करेल - जशी बाईबलची शिकवण आहे - तर त्या परिस्थितीत ते क्षमा करणे उपयुक्त आणि योग्य ठरेल जेव्हा त्या क्षमादानाचा परिणाम योग्य दिसून येतो. आणि ज्याला क्षमादान देण्यात आले आहे त्याच्यात योग्य प्रकारे सुधारणा व्हावी. हा त्या क्षमादानाचा उद्देश असावा. अन्यथा कायदा तोच आहे जो तोराह मध्ये नमूद केलेला आहे.